सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २२५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि.७ आक्टोंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी ३१ हजार ६२८ कोटींचे पॅकेज जाहीर; राज्य सरकारने केली मोठी घोषणा



| प्रकार | मदतीचा तपशील | प्रति हेक्टर मदत रक्कम | नोंद / स्रोत |
|---|---|---|---|
| एकूण नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिली जाणारी मदत | नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत | ६,१७५ कोटी | राज्य सरकारकडून जाहीर |
| कोरडवाहू शेतकरी | शेतीकामासाठी मदत | १८,५०० | प्रति हेक्टर |
| हंगामी बागायतदार शेतकरी | हंगामी बागायती शेतीसाठी मदत | २७,००० | प्रति हेक्टर |
| बागायती शेतकरी | कायम बागायती शेतीसाठी मदत | ३२,५०० | प्रति हेक्टर |
| बियाणे व इतर कामांसाठी सर्वसाधारण मदत | सर्व प्रकारच्या शेतकऱ्यांसाठी | १०,००० | प्रति हेक्टर |
| पीक विमा उतरवलेले शेतकरी | विम्याद्वारे मदत | १७,००० | प्रति हेक्टर (विम्यातून) |
| राज्य सरकारचे एकूण मदत पॅकेज | शेतकरी मदत आणि पुनर्बांधणीसाठी निधी | ३१,६२८ कोटी | सरकारकडून जाहीर पॅकेज |

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

शेतकऱ्यांचे आपल्या पिकावर पोटच्या पोराप्रमाणे प्रेम असते. अशा स्थितीत पीक करपून गेले, पाण्याखाली गेले, जमीन खरडून गेल्याने पुन्हा पेरणीची स्थितीही उरली नाही. आर्थिक आणि मानसिक त्रास शेतकऱ्यांना झाला. त्याची शंभर टक्के भरपाई कुणीच देऊ शकत नाही परंतु शेतकरी पुन्हा उभा राहिला पाहिजे यासाठी पॅकेज तयार केले आहे. ६८ लाख ६९ हजार हेक्टर जमिनीवरील पिकांचे नुकसान झाले. २९ जिल्हे आणि २५३ तालुके सरसकट मदतीच्या पॅकेजमध्ये घेतले आहेत. जिथे पिकांचे नुकसान झाले तिथे अटी शिथिल करून मदत केली जाणार आहे. राज्य सरकारने पूरग्रस्त भागातील शेतकऱ्यांसाठी ३१ हजार ६२८ कोटींची मदत जाहीर केली आहे.

या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, घरांची पडझड झाली, तिथे घरे उभारली जातील, ५० हजार रूपयांची मदत दुकानदारांना करणार आहेत. दुधाळ जनावरांसाठी ३७ हजार ५०० रूपये मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. ३ जनावरांची अट रद्द केली आहे. जेवढी जनावरे दगावली तेवढी मदत दिली जाईल. खरडून गेलेली जी जमीन आहे तिथे ४७ हजार हेक्टरी रोख आणि ३ लाख रूपये हेक्टरी नरेगाच्या माध्यमातून देणार आहोत. ज्या विहिरींमध्ये गाळ गेलाय, नुकसान झाले आहे तिथे विशेष बाब म्हणून ३० हजार रूपये प्रति विहीर भरपाई दिले जाणार आहे. पायाभूत सुविधांचे जिथे नुकसान झाले तिथे १० हजार कोटी मदत केली जाणार आहे असं त्यांनी सांगितले.

तसेच ६१७५ कोटी रूपये नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना देणार आहोत. बियाणे आणि इतर कामांसाठी प्रति हेक्टर १० हजार रुपये शेतकऱ्यांना दिले जाईल. कोरडवाहू शेतकऱ्यांना १८ हजार ५०० रुपये हेक्टरी, हंगामी बागायतदार शेतकऱ्यांना २७ हजार प्रति हेक्टरी, बागायती शेतकऱ्यांना ३२ हजार ५०० हेक्टर मदत दिली जाईल. ज्या शेतकऱ्यांनी विमा उतरवला आहे त्यांना १७ हजार प्रति हेक्टर मदत विम्यातून केली जाणार आहे. राज्य सरकारच्या वतीने ३१ हजार ६२८ कोटी रूपयांचे मदतीचे पॅकेज सरकारकडून दिले आहे. जास्तीत जास्त भरपाईचा पैसा दिवाळीच्या आधी देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे असंही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

दरम्यान, आम्ही तिघांनी बसून या पॅकेजवर चर्चा केली. शेतकऱ्यांवर अभूतपूर्व संकट असल्याने इतर ठिकाणचे चार पैसे कमी केली तरी शेतकऱ्यांना पैसे द्यायचे आहेत. कुठल्याही परिस्थितीत शेतकऱ्यांच्या मुलाचे शिक्षण बाधित होऊ नये यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. त्यासाठी सीएसआर फंड काही जण द्यायला तयार आहेत. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून पैसे दिले जातील. अजूनही काही मदतीची गरज असेल तिथे मदत करण्याची तयारी शासनाची आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## म्हणे, कसलाही पश्चात्ताप नाही... दैवी शक्तीनं सांगितलं

### सरन्यायाधीश हल्ला प्रकरणात 'त्या' वकिलाचं विधान




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नवी दिल्ली**

सुप्रीम कोर्टात सोमवारी एक धक्कादायक प्रकार घडला. वकील राकेश किशोर यांनी भारताचे सरन्यायाधीश (सीजेआय) बी. आर. गवई यांच्यावर बूट फेकण्याचा प्रयत्न केला. सोमवारी (६ ऑक्टोबर) सकाळी ११:३५ वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घढला. खजुराहो येथील एका मंदिरातील भगवान विष्णू यांची खंडीत मूर्ती व्यवस्थित करण्यासंदर्भातील एका याचिकेवर सीजेआय गवई सुनावणी करत असतानाच हा प्रकार घडला. दरम्यान, सुरक्षारक्षकांनी तात्काळ कारवाई करत राकेश किशोर यांना ताब्यात घेतले.

हिन्दुस्तान टाइम्सच्या वृत्तानुसार, ७१ वर्षीय वकील राकेश किशोर यांनी, या कृत्यासंदर्भात आपल्याला कसलाही पश्चात्ताप नसल्याचे म्हटले आहे. ते म्हणाले, मला एका दैवी शक्तीने असे करण्यास सांगितले होते. मी जेलमध्ये गेलो असतो तर बरे झाले असते. माझे कुटुंबयही माझ्या या कृत्यामुळे नाराज आहेत. त्यांना समजत नाहीये. त्यांच्या या विधानाने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे.

बार काउंसिल ऑफ इंडियाने (बीसीआय) या घटनेची गंभीर दखल घेत राकेश किशोर यांना तत्काळ प्रभावाने निलंबित केले आहे. बीसीआयचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ अधिवक्ता मनन कुमार मिश्रा यांनी जारी केलेल्या अंतरिम निलंबन आदेशात म्हटले आहे की, राकेश किशोर यांचे हे कृत्य न्यायालयाच्या प्रतिष्ठेच्या विरोधात आहे. तसेच हे अधिवक्त्यांच्या आचारसंहितेचा आणि अधिवक्ता अधिनियमाच्या, १९६१ च्या नियमांचे स्पष्ट उल्लंघन आहे.

निलंबनाच्या कालावधीत राकेश किशोर यांना कोणत्याही न्यायालय, प्राधिकरण किंवा अधिकरणात हजर राहता येणार नाही. त्यांच्याविरुद्ध अनुशासनात्मक कारवाई देखील सुरू करण्यात येणार आहे.

## जिल्हास्तरावर बनावट औषधी पुरवठादारांसह एजन्सींवर कार्यवाही कधी होणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

आरोग्य सेवा आयुक्तालयाने शासकीय रुग्णालयात बनावट औषधांचा पुरवठा करणाऱ्या एजन्सी आणि पुरवठादारांची नावे जाहीर केली असून त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करावी, असे पत्र ३ ऑक्टोबर रोजी राज्यभरातील जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना पाठविले आहे. त्यामुळे आता जिल्हास्तरावर बनावट औषधी पुरवठादारांसह एजन्सींवर कार्यवाही होणार असल्याने अनेकांची भंबेरी उडाली आहे.




शासकीय रुग्णालयात बनावट औषध पुरवठा होत असल्याचा विषय हा ४ जुलै पासून पुढे आला. अन्न व औषध प्रशासनाने ही बाब निदर्शनास आणली होती. तसे पत्र 'एफडीए' आयुक्तांनी आरोग्य संचालकांना पाठविले होते. मात्र, आरोग्य विभागाने बनावट औषध पुरवठादारांच्या मुसक्या आवळण्यासाठी तब्बल तीन महिने का घेतले? हा संशोधनाचा विषय आहे. प्रयोगशाळेच्या अहवालानुसार, लेबल वेगळे आणि औषधांचे मूळ घटक नव्हते. तरीही जिल्हास्तरावर ते औषध का खरेदी केले, हे देखील महत्त्वाचे आहे. एकंदरीत औषधी खरेदीत दलालांची साखळी असून यात जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि औषध भांडारप्रमुखही तितकेच जबाबदार मानले जात आहेत. आता आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या निर्देशानुसार, बनावट औषध पुरवठादारांवर कोणती कारवाई केली जाते, याकडे नजरा लागल्या आहेत.

> गतवर्षी ग्लेशिअर आणि राजेश फार्मा या दोन्ही पुरवठादारांच्या औषधांचे नमुने प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी पाठविले होते. योग्य अहवाल प्राप्त झाल्यानंतरच पुरवठा करण्याचे आदेश दिले होते. मात्र, इतर ठिकाणी ते औषध पुरवठा करीत असतील तर याविषयी माहिती नाही.
>
> **– डॉ. सुरेश आसोले, डीएचओ, अमरावती.**

## अतिवृष्टीग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना राज्य सरकारचा दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७मुंबई**

सप्टेंबर अखेर राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अतोनात नुकसान झाले आहे. हाता तोंडाशी आलेली पिके सडली. त्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे. अतिवृष्टीग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क भरणंही कठीण असून राज्य सरकारने दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क पूर्णपणे माफ करण्यात आले आहे. याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माहिती दिली.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, राज्यात अतिवृष्टीचा मोठा फटका बसला आहे. तब्बल दोन हजार ६९ मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली आहे. अतिवृष्टी आणि पुराचा फटका बसल्याने २९ जिल्ह्यांमध्ये नुकसान झाले आहे.

अतिवृष्टी झाल्यानंतर ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली जात होती. राज्य सरकारने असा निर्णय घेणे नियमानुसार शक्य नसल्याचे स्पष्ट केले. मात्र दुष्काळाच्या काळात ज्या उपाययोजना केल्या जातात, त्या केल्या जाणार असल्याचे जाहीर केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'ओला दुष्कार जाहीर करण्याची मागणी होत आहे. त्यासंदर्भात आम्ही जी घोषणा केली होती, त्यानुसार टंचाई ज्याला आपण दुष्काळ म्हणतो. त्या काळातील ज्या उपाययोजना आहेत. ओला दुष्काळ समजून त्या उपाययोजना केल्या जाणार आहेत. त्यात जमीन महसूलात सूट, कर्जाचे पुनर्गठण, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषी पंपाचे वीज बिल लागत नाहीये, त्यामुळे तो विषय संपला आहे. शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफ करणार आहोत', अशी माहिती फडणवीसांनी दिली.

## युतीमध्ये जागा वाटपात जागा मिळाल्या नाहीत तर स्वबळावर लढू' स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आठवले तयार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ नागपूर**

येणार्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी सज्ज राहा. युतीमध्ये जागा वाटपात आपल्याला जागा सोडण्यात आल्या नाही तर स्वबळावर लढा, असे आवाहन रिपाइं (आठवले) चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी येथे केले.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचा विदर्भ सत्ता संपादन कार्यकर्ता मेळावा जवाहर विद्यार्थी वसतिगृह येथे पार पडला. मेळाव्याचे उद्घाटन करताना ते बोलत होते. यावेळी काकासाहेब खामगावकर, ॲड. विजय आगलावे, नागपूर शहराध्यक्ष विनोद थूल, दयाल बहादुरे, पप्पू कागदे, डॉ. पुरण मेश्राम, भीमरावजी बनसोड, बाळू घरडे, राजन वाघमारे, सतीश तांबे, मोरेश्वर डुले, रमेश मेश्राम, जगन डोरले, जयदेव चिंवडे, प्रबोधनकार अनिरुद्ध शेवाळे प्रामुख्याने उपस्थित होते. रामदास आठवले म्हणाले, पक्षवाढीसाठी कार्यकर्त्यांनी कटिबद्ध राहून काम करावे. प्रत्येक जिल्ह्यात आपल्या पक्षाचे उमेदवार उभे करणार आहोत. त्याकरिता कार्यकर्त्यांनी त्याची जाणीव ठेवून काम करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. प्रास्ताविक राहुल गजबे यांनी केले. डॉ. मनोज मेश्राम यांनी आभार मानले.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जे. नंदकुमार जी यांची गुरुकुंज आश्रमाला सदिच्छा भेट!

### संघ शताब्दी वर्ष व तुकडोजी महाराजांच्या पुण्यतिथी महोत्सवाच्या निमित्ताने गुरुकुंज मोझरी येण्याचा योग




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७गुरुकुंज मोझरी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला शंभर वर्षे पूर्ण झाल्या असल्याने. संपूर्ण भारतभर संघाच्या वतीने भव्य प्रमाणात पथसंचालन व श्री विजयादशमीच्या कार्यक्रमाचे जिल्हा स्थान ,तालुका स्थान व ग्राम शाखेपर्यंत कार्यक्रमाचे आयोजन सुरू आहे. या निमित्ताने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रज्ञा प्रवाहाचे अखिल भारतीय संयोजक जे. नंदकुमार जी हे अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असताना श्रीक्षेत्र गुरुकुंज मोझरी येथे राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांचा ५७ वा पुण्यतिथी महोत्सव सुरु असताना गुरुकुंज आश्रमाला भेट दिली व समाधी स्थळाचे दर्शन घेत, आश्रम परिसराची माहिती जाणून घेतली. यावेळी राष्ट्रसंतांच्या राष्ट्रीय विचारांनी भारावून गेले.याप्रसंगी अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस मा. श्री. जनार्दनपंथ बोथे गुरुजी, डॉ. राजारामजी बोथे, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा मंत्री रुपेश राऊत, श्री धीरजजी इंगळे, शुभम जी बोथे आधी उपस्थित होते.

## गिरीश महाजनांचा मोठेपणा, मंत्रिपदाचे १ वर्षाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीत जमा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

राज्यातील अतिवृष्टीग्रस्तांनामदतीचं आवाहन केल्यानंतर मुख्यमंत्री सहायता निधीत राज्यभरातून मदतीचा ओघ वाढला आहे. महायुतीच्या सर्वच आमदार-खासदारांनी आपला एक महिन्याचा पगार शेतकऱ्यांच्या मदतीसाठी देऊ केला आहे. मात्र, राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी मंत्रिपदाचे वर्षभराभरातील वेतन रक्कम रुपये ३१ लक्ष १८ हजार २८६ रुपये मुख्यमंत्री सहायता निधीस दिले आहे. त्याबाबतचे धनादेश व संमतीपत्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आज राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीतच सादर केले.



राज्यात मुसळधार पावसामुळे शेतीचे झालेले नुकसान तसेच राज्यातील विविध भागात महापुरामुळे झालेले नुकसान यासाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून नागरिकांना मदत करण्यात येत आहे. राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री श्री गिरीश महाजन यांनी राज्यातील अनेक जिल्ह्यांना भेट देऊन झालेल्या नुकसानीचे तसेच पाहणी केली आहे. मराठवाड्यातील जालना,बीड छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, सोलापूर तर उत्तर महाराष्ट्रातील जळगाव नाशिक, या जिल्ह्यांमध्ये मंत्री गिरीश महाजन यांनी भेटी घेऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली आहे. संकटकळात नागरिकांच्या मदतीला धावून जाणारे संकटमोचक म्हणून मंत्री गिरीश महाजन मदत करण्यात देखील संकटमोचक ठरले आहे. आपला वर्षभराचा पगार देणारे ते राज्यातील पहिलेच मंत्री ठरले आहे. सद्याच्या मंत्री पदाची शपथ घेतल्या पासून डिंसेबर २०२४ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीचे संपूर्ण वेतन रु. ३१ लक्ष १८ हजार २८६ त्यांनी मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधीस दिले आहे. पूर, दुष्काळ, आगीमुळे होणारे अपघात अशा मोठ्या नैसर्गिक आपत्तींमुळे बाधीत नागरिकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधी मार्फत अर्थसहाय्य पुरविले जाते. अनेक सेवाभावी संस्था संस्था यांनी मुख्यमंत्री सहायता निधी दिले आहेत त्याचप्रमाणे लोकप्रतिनिधी देखील मानधन दिले आहे.

## संपादकीय ......

# भगव्या वस्त्रांखाली कुकर्माचे साम्राज्य!

*धर्म-आस्था आणि श्रद्धेच्या नावाखाली भोळ्याभाबड्या, रंजल्यागांजल्या, दीनदुबळ्या जनतेची जेवढी थट्टा भारतात भोंदूबाबांनी केलीय तेवढी जगातल्या इतर देशांत कदाचितच कुणी केली असेल. धर्म-कर्मकांडाच्या नावाखाली भाविकांचे आयुष्य आणि त्यांच्या भावनांशी खेळणारे हे भोंदूबाबा भाविकांच्या डोळ्यांत धूळफेक करतानाच स्वत: अधर्म व पापाच्या खोल दरीत शिरत जातात. पांढरी किंवा भगवी वस्त्रे परिधान करून कुकर्मांचे साम्राज्य उभारणार्या या भोंदूबाबांच्या कृती उघड होताच त्यांच्या भक्तांसह संपूर्ण समाजालाच त्यांची लाज वाटते. आसाराम बूप, राम रहिम, नित्यानंद, नारायण साई यांच्याच मालिकेत एक नवीन नाव जोडले गेले आहे ते स्वयंघोषित स्वामी चैतन्यानंद सरस्वती याचे.*

*आपल्याच शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थिनींचे लैंगिक शोषण आणि कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेल्या या अश्लील बाबाविरुद्धच्या गुन्ह्यांची मोजदाद सध्या सुरू आहे. शिक्षणाच्या नावाखाली निष्पाप विद्यार्थिनींचे जीवन उद्ध्वस्त करणार्या या बाबांची दिल्ली पोलीस सध्या चौकशी करत आहेत. तब्बल १७ विद्यार्थिनींसह महिलांचे लैंगिक शोषण केल्याचे गंभीर आरोप असलेल्या या स्वयंघोषित बाबाला दिल्ली पोलिसांनी रविवारी अटक केली होती. काही दिवसांपूर्वी चमचमत्या बीएमडब्ल्यू कारमध्ये बसून भगव्या वस्त्रांनी भक्तांना चकित करणारा बाबा चैतन्यानंद आता टी-शर्ट आणि चप्पल घालून पोलिसांसमोर खुर्चीत बसला आहे. मोबाईल, आयपॅडचे पासवर्ड विसरल्याचे बहाणे देत आहे. परंतु त्याच्या ३०० पानांच्या कबुलीजबाबावरून त्याचे डर्टी सिक्रेट बाहेर पडत आहेत.*

*सध्या पोलिसांच्या कोठडीत असलेल्या चैतन्यानंदची कसून चौकशी सुरू आहे. या चौकशीतून चैतन्यानंदचे अनेक लाजिरवाणे आणि धक्कादायक काळे कारनामे समोर येत आहेत. या चौकशीच्या आधारे पोलिसांनी त्याचा मोबाईल, आयपॅड आणि घराचीही तपासणी केली. या तपासणीत त्याच्या मोबाईल, आयपॅडमध्ये अश्लील मेसेज, महिला, विद्यार्थिनींचे गुप्तपणे काढलेले फोटो आढळले. एवढेच नाही तर एका कथित चॅटमध्ये तो दुबईच्या राजासाठी सेक्स पार्टनरची व्यवस्था करण्यास सांगत असल्याचेही समोर आले आहे.*

*चैतन्यानंदच्या घरातून सेक्स टॉय, अश्लील-पॉर्न दृश्ये असलेली सीडी, ३ बनावट फोटो पोलिसांच्या हाती लागले. या बनावट फोटोमध्ये स्वामी चैतन्यानंद सरस्वती चक्क पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमेरिकेचे माजी अध्यक्ष बराक ओबामा आणि हॉलिवूडचा सिनेदिग्दर्शक डेव्हिड कॅमेरुन यांच्याबरोबर दिसतो. अर्थात हे फोटो बनावट आहेत.*

*पार्थसारथी नावाचा हा भोंदू बाबा मूळचा ओडिशाचा आहे. दिल्लीच्या वसंत कुंजमध्ये त्यानं शारदा इन्स्टिट्यूट सुरू केली. जिथं त्याचा एकछत्री अंमल होता. आपली लैंगिक इच्छा पूर्ण करण्यासाठी स्वामी चैतन्यानंद या इन्स्टिट्यूटमधल्या गरीब विद्यार्थिनींनाच लक्ष्य करायचा. नोकरीचे खोटे आमिष दाखवून तो त्यांना जाळ्यात ओढायचा. त्यांच्याकडे वेगवेगळ्या इच्छा व्यक्त करायचा. त्याने अनेक विद्यार्थिनींना परदेशात घेऊन जाण्याचे, सर्व सुखसोयी आणि चांगले मार्क्स देण्याचे आश्वासन दिले होते.*

*चैतन्यानंदने विद्यार्थिनींच्या वसतिगृहाच्या खोल्यांमध्ये छुपे कॅमेरे बसवले होते. तो त्या कॅमेर्यांद्वारे मुलींचे खासगी क्षण रेकॉर्ड करायचा आणि नंतर ते फोटो दाखवून त्यांना ब्लॅकमेल करायचा. तो विद्यार्थिनींना अश्लील मेसेज पाठवायचा आणि रात्री त्यांना त्याच्या खोलीत बोलवायचा. नकार देणार्या विद्यार्थिनींना करिअर उद्ध्वस्त करण्याची धमकी द्यायचा. हे प्रकरण एका हवाई दलाच्या अधिकार्यापर्यंत पोहोचल्यावर त्यांनी तात्काळ दिल्ली पोलिसांत तक्रार नोंदवली. पोलिसांनी क्षणाचाही विलंब न करता चैतन्यानंदला अटक केली. त्याच्या कुकर्मात भागीदार इन्स्टिट्यूटच्या दोन वॉर्डन आणि एक असोसिएट डीन यांनाही दिल्ली पोलिसांनी अटक केली आहे.*

*धनदांडगे सामाजिक दातृत्वाची खोटी शाल अंगावर पांघरण्यासाठी अशा बाबाबुवांना सढळ हस्ताने मदत करतात, त्यांच्या कार्यक्रमांना गर्दी जमत असल्याने राजकारणीही या बाबांचे पाय धरायला कमी करत नाहीत. कधीकाळी कवडीचीही किंमत नसलेले हे भोंदूबाबा अशाच प्रकारे इव्हेंट मॅनेज करून स्वत:ची प्रतिमा चमकवतात आणि भाविकांना आपल्या जाळ्यात अडकवतात. कधीकाळी चमत्काराच्या नावाखाली लोकांच्या श्रद्धेशी खेळ केला जात असे. आता उपदेश आणि धर्माच्या नावाखाली अधर्माचा खेळ खेळणार्या फसव्या बाबांची यादी सतत वाढत आहे. पोलिसांच्या कचाट्यात अडकलेल्या चैतन्यानंदची आता काही खैर नाही. बाबाच्या अन्यायाने पीडित विद्यार्थिनींना लवकरात लवकर न्याय मिळेल अशी अपेक्षा. आयुष्य म्हणजे रोलर कोस्टर राइड. या चढउतारात कधी यश येते तर कधी अपयश, पण वाईटातल्या वाईट परिस्थितीतही अशा बाबांच्या नादी न लागणेच बरे.*

# तुम्ही टोमॅटोची रोपे तयार करत असाल तर 'या' गोष्टी लक्षात घ्या, वाचा सविस्तर

**दि. ७ विदर्भ प्रजासत्ताक**

रब्बी हंगामात सप्टेंबर ते ऑक्टोबर या कालावधीत रोपवाटिकेमध्ये रोपे तयार करून ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात पुनर्लागवड केली जाते. साधारणपणे सरळ वाणांसाठी १६० ग्रॅम व संकरित वाणांसाठी ५० ग्रॅम बियाणे प्रति एकरसाठी पुरेसे होते.

थायरम किंवा कॅप्टन ३ ग्रॅम किंवा ट्रायकोडर्मा २.५ ग्रॅम प्रतिकिलो बियाणे चोळावे.

त्यानंतर झोटोबॅक्टर २.५ ग्रॅम प्रतिकिलो बियाण्यास चोळावे.

साधारणपणे १ एकर क्षेत्रावर लागवडीसाठी १.२ गुंठ्यांची रोपवाटिका पुरेशी असते.

रोपवाटिकेची जमीन उभी-आडवी चांगली नांगरून कुळवाच्या दोन पाळ्या द्याव्यात.

त्यानंतर ३ मीटर लांब, १ मीटर रुंद आणि १५ सें.मी. उंचीचे गादीवाफे तयार करावेत.

गादीवाफ्यांमध्ये ५ किलो चांगले कुजलेले शेणखत, ८० ग्रॅम १९:१९:१९ किंवा १०० ग्रॅम १५:१५:१५ आणि २०० ग्रॅम निंबोळी पेंड चांगली मिसळावी.

सोबत ट्रायकोडर्मा ५० ग्रॅम एकसारखे मिसळून घ्यावे.

जेणेकरून रोपवाटिकेमध्ये मर रोगाचा प्रादुर्भाव टाळला जाईल.

गादीवाफ्यावर हाताने किंवा खुरप्याच्या साह्याने



रब्बी टोमॅटो रोपवाटिका

१० सें.मी. अंतरावर रेषा ओढून त्यामध्ये १ सें.मी. अंतरावर बी पेरावे.

लगेच बी मातीने झाकून झारीने हलके पाणी द्यावे. साधारण ५ ते ८ दिवसांत बी उगवते.

बी उगवेपर्यंत झारीने पाणी द्यावे. नंतर जमिनीच्या मगदुरानुसार पाटाने पाणी द्यावे. पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. रोपे उगवल्यानंतर ६०-१०० मेश नायलॉन नेट किंवा पांढरे पातळ कापड २ मीटर उंचीपर्यंत मच्छरदाणी प्रमाणे गादीवाफ्यावर लावून रोपे झाकून घ्यावीत. रोपे २५ ते ३० दिवसांत पुनर्लागवडीसाठी तयार होतात.

**- ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी**

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष


शेतकरी ते थेट ग्राहक

**कामधेनु नॅचरल्स**

उत्तम आहार सर्वोत्तम जीवन

विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी

समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती

नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०





## व्हिटॅमिन डी बद्दल आश्चर्यचकित करणारे फॅक्ट, वाचाल तर थक्क व्हाल !

**दि.७ विदर्भ प्रजासत्ताक १४**

शरीर निरोगी राहण्यासाठी विविध व्हिटॅमिन्स आणि मिनरल्स आवश्यक असतात. व्हिटॅमिन्समध्ये विविध व्हिटॅमिन्सचा समावेश असतो, व्हिटॅमिन ई पासून ते व्हिटॅमिन बी १२ पर्यंत प्रत्येक व्हिटॅमिन शरीरात वेगवेगळी भूमिका निभावतो. यात 'व्हिटॅमिन डी' शरीरासाठी अधिक आवश्यक सांगितले जाते. व्हिटॅमिन डी ला 'सनशाईन व्हिटॅमिन' असेही म्हणतात. व्हिटॅमिन डी हाडांसाठी उपयुक्त असतेच याशिवाय अनेक गोष्टींसाठी व्हिटॅमिन डी गरजेचे आहे. आज आपण एम्स, हार्वर्ड युनिव्हरसिटीच्या डॉक्टरांनी व्हिटॅमिन डी बद्दल आश्चर्यचकित करणारे सांगितलेले फॅक्ट पाहूयात व्हिटॅमिन डी हे केवळ एक व्हिटॅमिन नाही तर शरीरासाठी एक हार्मोन आहे. तज्ज्ञांच्या मते, व्हिटॅमिन डी २०० पेक्षा जास्त जीन्स नियंत्रित करतो आणि शरीरासाठी आवश्यक असणाऱ्या कामांसाठी कार्य करतो.

खाण्याच्या खूप कमी पदार्थांपासून व्हिटॅमिन डी मिळते. असे सांगितले जाते की, सॅल्मन, टूना, अंडी, मशरूम या पदार्थात व्हिटॅमिन डी चे प्रमाण जास्त असते. पण, तज्ज्ञांच्या मते या पदार्थांच्या तुलनेत तुम्ही केवळ १५ मिनिटे उन्हात बसल्याने तुमची स्कीन जास्त व्हिटॅमिन डी मिळवते.

शरीरात कितीही व्हिटॅमिन डी असले तरी त्याचे निदान केल्यास ते कमीच दिसते. अशा परिस्थितीत, तुम्ही याचे प्रमाण थकवा, वारंवार आजारी पडण्याच्या समस्येवरून ओळखू शकता.

अनेकजण व्हिटमिन डी च्या




सप्लीमेंट्स घेतात. पण, या सप्लीमेंट्स जास्त घेणे महागात पडू शकते. विशेष करून किडनी खराब होऊ शकते. त्यामुळे तज्ज्ञांच्या सल्ल्याने व्हिटॅमिन डी सप्लीमेंट्स घ्याव्यात. व्हिटॅमिन डी मिळवण्यासाठी सूर्यप्रकाश घेणे हा उत्तम पर्याय आहे. तुम्ही जर अर्धा तास सूर्यप्रकाश घेतलात तर १०००- २००० खण व्हिटॅमिन डी मिळवू शकता.

लहान मुलांनी सप्लीमेंट्सद्वारे व्हिटॅमिन डी देणे चुकीचे आहे. मुलांच्या शरीरात आहारातून आणि सूर्यप्रकाशाच्यामाध्यमातून व्हिटॅमिन डी वाढवावे. व्हिटॅमिन डी हाडांच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे हे आपल्याला माहिती आहे. पण, तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार एक गोष्ट समोर आली आहे की, व्हिटॅमिन डी फक्त हाडांच्या आरोग्यासाठी उपयुक्त नाही तर स्नायूंच्या वाढीसाठी फायदेशीर आहे.

# अभिजात मराठी भाषा परिषद देशाच्या दृष्टीने महत्त्वाची - मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती-** प्रत्येक भाषेने आपली अस्मिता उभी केली आहे. त्यामुळे ही अस्मिता अखंडपणे पुढे न्यायची असल्यास देशातील अभिजात भाषेचे महत्त्व अधोरेखित करावे लागणार आहे. त्यामुळे अमरावती येथील पहिली अभिजात मराठी भाषा परिषद देशाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरणार आहे, असे मत मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी व्यक्त केले.संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात अभिजात मराठी भाषा परिषद आयोजित करण्यात आली आहे . या परिषदेच्या निमित्ताने डॉ. सामंत यांनी भेट दिली. यावेळी मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवळगावकर, मराठी भाषा विभागाचे सचिव किरण कुलकर्णी, मधुकर जोशी आदी उपस्थित होते.मंत्री डॉ. सामंत म्हणाले, परिषदेच्या निमित्ताने देशभरातील विद्वान एकत्रित झालेले आहेत. त्यांच्या ज्ञानाने अभिजात भाषांना नवी दिशा





मिळणार आहे. या ठिकाणी खऱ्या अर्थाने ११ अभिजात भाषांचा संवाद होत आहे. अखंड भारतात विविध बोलीभाषा बोलल्या जातात. त्याचे रूपांतर बोलीभाषेत होते. असाच प्रकार कोकणी भाषेबाबत झालेला आहे. प्रत्येक भाषेचा सन्मान व्हावा, मातृभाषा ही अभिमानाची असून ती बोलता आली पाहिजे, भावना कळल्या पाहिजे.अभिजात भाषा परिषद ही विद्यार्थ्यांसमोर होणे गरजेचे आहे. यातून त्यांना भाषेची ताकद कळली असती. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर जवाहरलाल नेहरू विद्यापीठात अध्ययन केंद्र स्थापन करून मराठी अजरामर झाली आहे. येत्या काळात विविध भाषांमध्ये चांगले साहित्य भाषांतरीत व्हावे, यासाठी अनुवाद समिती स्थापन करण्यात येणार आहे. आज तंजावर सारख्या भागात मराठीचे अस्तित्व आहे. त्यामुळे ४०० वर्षांनंतरही या ठिकाणी भाषेचे अस्तित्व टिकून आहे. त्यामुळेच मराठीला अग्रक्रम आहे. तंजावर सारख्या राज्यामध्ये मराठी भाषा भवन बांधण्यासाठी शासनाने जागा उपलब्ध करून दिलेली आहे. या ठिकाणी बांधकाम करण्यासाठी सहकार्य करण्यात येणार आहे. तंजावर सारखी अस्मिता आपणही उभी केली पाहिजे. अभिजात भाषांचे कार्य अखंडपणे पुढे न्यावे, यासाठी कर्तव्य म्हणून चांगले नियोजन करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# इतवारा बाजार परिसरात प्लास्टिक जप्ती व दंडात्मक मोहीम : ५ हजारांचा दंड

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.७अमरावती-**अमरावती महानगरपालिकेमार्फत शहरात प्लास्टिक जप्ती मोहिमेला गती मिळाली असून त्याअंतर्गत मनपा उत्तर झोन क्र. १ इतवारा बाजार परिसरात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक जप्ती व दंडात्मक कारवाई करण्यात आली.

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त (प्रशासन) डॉ. मेघना वासनकर, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव तसेच सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले यांच्या आदेशानुसार आज सकाळपासून मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान एकूण २० आस्थापना, हातगाड्या, भाजीपाला व फळ विक्रेत्यांची तपासणी करण्यात आली. तपासणीवेळी व्यापाऱ्यांकडे कागदी पिशव्यांचा तसेच ५० मायक्रोनपेक्षा जास्त जाडीच्या पिशव्यांचा वापर होत असल्याचे दिसून आले. मात्र हाजी जनरल स्टोअर या दुकानात बंदी असलेले प्लास्टिक आढळल्याने त्या दुकानावर महानगरपालिकेने थेट ५,००० रुपये दंड ठोठावला.

प्लास्टिकचा वापर बंद



करण्याबाबत वारंवार सूचना देऊनही काही व्यापारी अजूनही बंदी घालण्यात आलेल्या प्लास्टिकचा वापर करत असल्याने महापालिकेने अशा दुकानांवर कठोर कारवाई सुरू केली आहे. मनपा प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले की नियमांचे उल्लंघन करणार्या आस्थापनांवर पुढील काळात अधिक मोठ्या प्रमाणावर दंडात्मक कार्यवाही होणार आहे.

या कारवाईत जेष्ठ स्वास्थ निरीक्षक आर. के. डिक्याव, प्लास्टिक पिशवी जप्ती पथक प्रमुख विक्की जैदे, अनिकेत महल्ले, स्वास्थ निरीक्षक विनोद टांक, मिथुन उसरे, प्रविण उसरे, इम्रान खान, निखिल खंगाळे व सचिन सैनी यांची सक्रिय उपस्थिती होती.

महापालिकेच्या या मोहिमेमुळे परिसरात प्लास्टिकच्या वापरास आळा बसून नागरिक व व्यापाऱ्यांमध्ये पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर करण्याबाबत जनजागृती वाढण्यास मदत होत आहे.

महानगरपालिका प्रशासनाने आवाहन केले आहे की, व्यापाऱ्यांनी तात्काळ प्लास्टिकचा वापर थांबवून कागदी, कापडी किंवा जूट पिशव्यांचा वापर करावा. नियमांचे पालन न केल्यास कठोर कारवाईस सामोरे जावे लागेल.

# खाजगी दवाखाने आणि हेल्थ पॉलीसीचा स्कॅम

या देशातील आरोग्य व्यवस्थेतील एक अत्यंत गंभीर आणि दुर्लक्षित प्रश्न म्हणजे खाजगी दवाखाने आणि हेल्थ पॉलिसी यांच्यातील गुप्त साठगाठ आणि त्यातून निर्माण झालेल प्रचंड मोठ्या आर्थिक शोषणाचा जाळ. गेल्या काही वर्षात आरोग्य विमा म्हणजेच हेल्थ पॉलिसी लोकांमध्ये लोकप्रिय झाल्या. 'आपत्कालीन प्रसंगी उपयोगी पडेल' या भावनेतून लाखो लोक दरवर्षी हजारो रुपयांचा प्रीमियम भरतात. पण जेव्हा प्रत्यक्षात उपचाराची वेळ येते तेव्हा रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबाला कळते की या पॉलिसींच्या नावाखाली एक मोठा स्कॅम चालू आहे.खाजगी रुग्णालयांमध्ये जर तुम्ही सरळ पैसे देऊन उपचार घेतले, तर एकच उपचार काही हजार रुपयांत पूर्ण होतो. पण जर तुम्ही सांगितले की तुमच्याकडे हेल्थ पॉलिसी आहे तर तेच डॉक्टर आणि तीच औषधे अचानक सोन्याच्या भावात मोजली जातात. पंधरा-वीस हजारात होणारा उपचार लाखभर रुपयांचा दाखवला जातो. हॉस्पिटलचे बिल वाढवून तयार केले जाते, अनावश्यक टेस्ट घेतल्या जातात, महागड्या औषधांचा वापर दाखवला जातो आणि शेवटी सगळं बिल विमा कंपनीकडे पाठवलं जातं. विमा कंपनी त्यातील काही रक्कम भरते आणि उरलेला भार रुग्णावर येतो. शेवटी नुकसान होते ते नेहमीच रुग्णाचे कारण तो ना पूर्ण उपचार घेऊ शकतो, ना पूर्ण पैसे परत मिळवू शकतो.याहूनही गंभीर म्हणजे या हेल्थ पॉलिसी बहुतेक वेळा काही विशिष्ट दवाखान्यांनाच लागू असतात. म्हणजेच तुम्ही गावातील एखाद्या डॉक्टरकडे गेलात तर तुमची पॉलिसी चालत नाही. पॉलिसीचा लाभ घ्यायचा असेल, तर तुम्हाला मोठ्या कॉर्पोरेट हॉस्पिटलमध्ये जावे लागते, हाच एक मोठा घोटाळा आहे. विमा



कंपन्या आणि हॉस्पिटल मालक यांच्यात करार असतो तो म्हणजे विमा कंपनीकडून रुग्ण आणा आणि बिल वाढवा. यामुळे छोटे प्रामाणिक डॉक्टर आणि ग्रामीण भागातील क्लिनिक हळूहळू संपत चालले आहेत. लोकांना जबरदस्तीने महागड्या उपचारांच्या चक्रात ढकलले जाते.आरोग्य हा माणसाचा मूलभूत हक्क आहे, पण आज आरोग्य म्हणजे एक व्यापार झालंय. प्रत्येक रुग्ण हा ग्राहक बनला आहे आणि प्रत्येक आजार एक व्यवसाय. या परिस्थितीत सरकारने खाजगी दवाखान्यांसाठी आणि हेल्थ पॉलिसीसाठी एक कडक आणि पारदर्शक धोरण तयार करणे अत्यावश्यक आहे. हेल्थ पॉलिसीच्या नियमांवर नियामक नियंत्रण असावे, प्रत्येक रुग्णालयाचे दर सरकारने ठरवावेत आणि उपचारांच्या बिलांवर डिजिटल देखरेख असावी. तसेच 'कॅशलेस' उपचाराच्या नावाखाली जे आर्थिक शोषण केले जाते, त्यावर कठोर कारवाई व्हावी.जोपर्यंत सरकार या विषयावर गांभीर्याने पाऊल उचलत नाही, तोपर्यंत आरोग्य व्यवस्था ही केवळ श्रीमंतांसाठीच राहील आणि सामान्य माणूस आपल्या आजारासोबत अन्यायाचाही भार वाहत राहील. खाजगी दवाखाने आणि हेल्थ पॉलिसींचे हे गुप्त नाते उघड करण्याची आणि त्यावर नियंत्रण आणण्याची हीच योग्य वेळ आहे. कारण आरोग्य हे व्यवसाय नसून मानवी हक्क आहे आणि त्यावर कोणाचाही मक्तेदारीचा हक्क असू नये.

**-अवकाश कैलासराव बोरसेमो-**
**९६८८६७६४५२**


आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. ७ ऑक्टोंबर २०२५

शहर/ग्रामिण

# कोल्ड्रिफ सिरप'चा वापर त्वरित थांबविण्याचे आदेश

## कॉंग्रेस अन् मविआला नव्या भिडूची गरज नाही

### मनसेला सोबत घेण्यास हर्षवर्धन सपकाळांचा नकार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अकोला**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मनसेला सोबत घेण्यास काँग्रेसने विरोध केला आहे. काँग्रेस आणि महाविकास आघाडीला नव्या भिडूला घेण्याची आवश्यकता नाही असं विधान प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे. त्यामुळे मनसेच्यामहाविकास आघाडीत समावेशावर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, इंडिया आघाडीच्या वाटाघाटी काँग्रेसच्या स्थानिक पातळीवर होणार आहेत. जिल्हा आणि ब्लॉक त्याशिवाय तिथले जिल्हाध्यक्ष, शहर अध्यक्ष युतीबाबत निर्णय घेणार आहेत. त्यांच्या निर्णयावर आम्ही सगळ्या गोष्टी सोडल्या आहेत. त्यामुळे नवीन भिडूची आवश्यकता काँग्रेसला आणि महाविकास आघाडीलाही नाही असं त्यांनी एका मुलाखतीत म्हटलं. त्यामुळे ज्या ठाकरे बंधूंच्या युतीची चर्चा राज्यात सुरू आहे. ही युती झाली तर महाविकास आघाडीचं काय होणार हा प्रश्न निर्माण झाला आहे.

**आम्ही कुठे युतीसाठी तुमच्याकडे आलोय - मनसे**

तर युतीसाठी तुमच्याकडे कोण आले होते, त्यांच्याकडे आमच्यापैकी कुणी गेले नव्हते त्यामुळे त्यांच्यावर भाष्य




करण्याची गरज नाही. आमच्या पक्षाला काय वाटते ते आमचे अध्यक्ष राज ठाकरे योग्य तो निर्णय घेतील. सध्या ज्या काही चर्चा असतील त्या माध्यमांत सुरू आहे. ज्या भेटीगाठी आहेत, त्या कौटुंबिक आहेत. राजकीय झाल्या नाहीत. आमच्या पक्षाकडून जो काही निर्णय असेल तो राज ठाकरेच घेतील. बाकीच्या पक्षांचे त्यांचे त्यांना लखलाभ असो. जर कुठलाही निर्णय घ्यायचा असेल तर आमच्या पक्षाकडून तो केवळ राज ठाकरे घेतील. आम्ही महाराष्ट्रसैनिक आहोत, आम्हाला जो काही आदेश येईल त्यावर आम्ही काम करू असं मनसे नेते अविनाश अभ्यंकर यांनी म्हटलं.

दरम्यान, काँग्रेस स्वतंत्र विचारधारेचा पक्ष आहे. ते मविआचे घटक आहे. स्थानिक पातळीवर युतीबाबत चर्चा होणार आहे. काही विभागात युती होऊ शकते, काही नाही. ठाण्यात कदाचित काँग्रेसची वेगळी भूमिका असेल. स्थानिक स्तरावर युती झाली नाही तर कुणासोबत जायचे अथवा नाही हे त्या त्या पक्षाचा निर्णय असेल. मविआचे घटक पक्ष चर्चेला बसतील तेव्हा हे विषय चर्चेत येतील. मुंबई, पुणे, पिंपरी चिंचवड, ठाणे, कल्याण डोंबिवली यासारख्या ठिकाणी मनसेसोबत युतीचा आमचा प्रयत्न आहे असं उद्धवसेनेचे नेते सचिन अहिर यांनी सांगितले.

## विषारी घटक आढळल्याने 'SR-13' बॅचवरील औषध जप्त करण्याचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६ अमरावती,** १मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये काही बालकांचा मृत्यू झाल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने तातडीने सूचना जारी केली आहे. यात 'कोल्ड्रिफ सिरप' या कफ सिरपच्या डठ-१३ बॅचमध्ये डायइथिलीन ग्लायकोल (Diethylene Glycol - DEG) हा विषारी रासायनिक घटक मिसळलेला आढळला आहे. त्यामुळे औषध जप्त करण्याच्या आदेश देण्यात आले आहे.राज्यातील नागरिक आणि आरोग्य संस्थांनी या औषधाचा उपयोग त्वरित वापरणे थांबवावे आणि ते तातडीने जप्त करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे कळविण्यात आले आहे.मे स्रेसन फार्मा यांच्या कफ सिरपमध्ये डायइथिलीन ग्लायकोल हा घटक आढळून आला आहे. या रसायनामुळे किडनी आणि यकृताला गंभीर नुकसान पोहोचवून मृत्यू घडवून





आणू शकतो.त्यामुळे घरात किंवा दवाखान्यात औषध उपलब्ध असल्यास त्याचे तातडीने वितरण आणि वापर थांबवा. हे औषध लगेच जप्त करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाला माहिती द्यावी. यासाठी टोल फ्री क्रमांक १८०० २२२ ३६५, ई-मेल ichq.fda-mahnic.in, मोबाईल क्रमांक ९८९२८३२२८९ संपर्क साधावा.विक्रेते, वितरक आणि रुग्णालये यांना अन्न व औषध प्रशासनाने राज्यातील सर्व औषध निरीक्षक आणि सहायक आयुक्त यांना तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. यात कोल्ड्रिफ सिरप, बॅच क्र. डठ-१३ चा साठा आढळल्यास त्याचे वितरण ताबडतोब थांबवावे. हा संपूर्ण साठा 'गोठवावा' आणि त्याची विक्री, वापर पूर्णपणे थांबवून त्याची माहिती प्रशासनाला द्यावी.अन्न व औषध प्रशासन विभाग या औषधाच्या वितरणाचा मागोवा घेण्यासाठी तामिळनाडू औषध नियंत्रण विभागाशी समन्वय साधत आहे. जनतेने आपल्या घरातील औषधे तपासावीत आणि हा धोका टाळण्यासाठी अत्यंत सावधानता बाळगावी, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

## अवैध औषधांचा साठा जप्तः एफडीएची कारवाई

### गर्भपात गोळ्या, नशायुक्त आणि कामोत्तेजक औषधे विना परवाना विकणाऱ्यांवर धाड

**विदर्भ प्रजासत्ताक- दि.६ अमरावती** २अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी एका गोपनीय माहितीच्या आधारावर शहरात मोठी कारवाई करत, अवैधरित्या गर्भपाताच्या गोळ्या, सवय जडणारी (नशायुक्त) तसेच कामोत्तेजक औषधे विक्रीसाठी साठवून ठेवलेला मोठा साठा जप्त केला आहे.

अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना दि. ३ ऑक्टोबर २०२५ रोजी रामपुरी कॅम्प परिसरात अवैध औषध साठ्याची माहिती मिळाली. यानुसार अधिकाऱ्यांनी रामपुरी कॅम्प, अमरावती येथील प्रतापसिंग ठाकुरानी यांच्या निवासस्थानाची चौकशी केली. चौकशीत प्रतापसिंग ठाकुरानी हे महानगरपालिकेच्या बगीच्यासमोर असलेल्या मे. अपना ड्रायफुटच्या वर, फ्लॅट क्र. १०१, दुसऱ्या मजल्यावर राहत असल्याची माहिती समोर आली. एफडीएच्या पथकाने या फ्लॅटवर धाड टाकली असता, तिथे मोठ्या प्रमाणात अवैधरित्या गर्भपाताच्या गोळ्या, सवय जडणारी व गुंगी आणणारी औषधे तसेच कामोत्तेजक औषधांचा साठा आढळून आला. जप्तीदरम्यान या औषधांचे कोणतेही खरेदी बिल आरोपींकडे आढळले नाही.

उपस्थित आरोपी राहुल



प्रतापसिंग ठाकुरानी आणि विश्वनाथ प्रतापसिंग ठाकुरानी यांनी हा औषध साठा विना बिलाने, कुठलाही परवाना नसताना धनंजय अंबुलकर, यवतमाळ यांच्याकडून खरेदी केल्याचे कबूल केले. हा साठा अवैधरित्या गर्भपात करण्यासाठी तसेच नशेसाठी विक्री करिता साठवल्याचे स्पष्ट झाले आहे.या अवैधरित्या साठवलेल्या औषध साठ्यापैकी ३ औषधांचे नमुने पुढील चाचणी व विश्लेषणासाठी घेण्यात आले आहेत. उर्वरित औषधे पंचनाम्याअंतर्गत जप्त करण्यात आली आहेत. याप्रकरणी गाडगेनगर पोलिस स्टेशन, अमरावती येथे दि. ३ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आला आहे.सदर कारवाई अन्न व औषध प्रशासनाचे सह आयुक्त, मि. कृ. काळेश्वरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त (औषधे), डॉ. अ. मा. माणिकराव आणि औषध निरीक्षक (गुप्तवार्ता), म. वि. गोतमारे यांनी पार पाडली.

## ८ डिसेंबरपासून नागपुरात होणार हिवाळी अधिवेशन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ नागपूर -** महाराष्ट्र विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन यंदा ८ डिसेंबरपासून नागपूर येथे सुरु होणार आहे. राज्य सरकारने या अधिवेशनासाठी तयारीला सुरुवात केली असून, नागपूर शहर पुन्हा एकदा राजकीय घडामोडींचं केंद्रबिंदू ठरणार आहे. अधिवेशनात राज्यातील महत्त्वाचे कायदे, वित्तीय विषय, जनहिताचे प्रश्न आणि विभागीय विकास या मुद्द्यांवर सखोल चर्चा होण्याची शक्यता आहे.



दरवर्षीप्रमाणे यंदाही हिवाळी अधिवेशनाची पार्श्वभूमी राजकीय घडामोडींनी गहिरी झाली आहे. सरकारच्या धोरणांवर विरोधकांकडून कडाडून प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता असून, महागाई, शेतकऱ्यांचे प्रश्न, वीज दरवाढ, बेरोजगारी यासारख्या मुद्द्यांवर अधिवेशनात तीव्र चर्चा होण्याची अपेक्षा आहे.राज्य शासनाकडून अधिवेशनासाठी सुरक्षेच्या तसेच लॉजिस्टिक दृष्टीने तयारी करण्यात येत आहे. विधिमंडळ सचिवालयाने अधिवेशनासाठी सर्व सदस्यांना सूचना पाठवल्या असून, नागपूरमध्ये रेल्वे व हवाई सेवांमध्येही अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर वाढ होण्याची शक्यता आहे.अधिवेशनाच्या काळात नागपूर शहरात मोठ्या प्रमाणावर सुरक्षा व्यवस्था तैनात केली जाणार आहे. अनेक मंत्र्यांचे निवास आणि कार्यालये याठिकाणी काही काळासाठी हलवण्यात येणार आहेत. तसेच पत्रकारांसाठी स्वतंत्र मीडिया सेंटरचीही व्यवस्था करण्यात येणार असल्याचे सुत्रांनी सांगितले.राज्यातील प्रमुख राजकीय पक्षांसाठी हे अधिवेशन आगामी स्थानिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचं ठरणार आहे.

## मध्यवर्ती कारागृहातील सुरक्षेवर प्रश्न

### अंडासेलमधील दोन कैद्यांजवळ सापडले तीन मोबाईल

#### फ्रेजरपुरा पोलिसात गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती -** मध्यवर्ती कारागृहातील विशेष झडतीमध्ये अंडासेलमधील दोन कैद्यांजवळ तीनमोबाईल सापडले आहेत. या प्रकारामुळे कारागृहातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, दोन्ही कैद्यांविरुध्द फ्रेजरपुरा पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.६ऑक्टोबरला रात्री ८-१२ वाजताच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला. मध्यवर्ती कारागृहाच्या गेटवर झडती



अंमलदार म्हणून ड्युटीवर असलेल्या अनिष गजानन हरणे (३७) यांनी अंडासेलमधील दोन कैदी तरबेज दरवेश खान, दस्तगीर गफुर शहा (दोन्ही रा अम.)यांचीझडती घेतली. तुरुंग अधिकारी देवराव रोडा जाधव यांच्या आदेशाने १२ अंमलदार यांना सोबत घेऊन ही झडती घेण्यात आली. यावेळी त्यांच्या ताब्यातून लावा कंपनीचा कीपॅड असलेला मोबाईल, ॲपल कंपनीचा ॲन्ड्रॉइड मोबाईल, व नोकिया कंपनीचा किपॅड फोन तसेच दोन नग मोबाईल बॅटरी असे साहित्य सापडले. त्यांच्याकडून हे मोबाईल जप्त करण्यात आले. कारागृह नियमावलीचे उल्लंघन केल्यामुळे दोन्ही कैद्यांविरुध्द अनिष हरणे यांनी फ्रेजरपुरा पोलिस स्टेशनला तक्रार दिली. यानुसार त्यांच्याविरुध्द कलम १८८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आधार नोंदणी, अपडेटची आता खिशाला झळ

### ५० टक्क्यांपर्यंत दरवाढीने सर्वसामान्यांमध्ये रोष

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती** प्राधिकरण यांच्या कार्यालयाने १ ऑक्टोबर २०२५ पासून आधार नोंदणी व अद्ययावतीकरण सेवांसाठी सुधारित दर निश्चित केले आहेत. या सेवांच्या शुल्कात ५० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. सर्वसामान्यांच्या खिशाला त्याची मोठी झळ पोहोचत असून दरवाढीमुळे रोष व्यक्त केला जात आहे.

आधार कार्ड भारतातील प्रत्येक रहिवासी नागरिकांसाठी सक्तीचे आहे. नवजात बालकापासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत प्रत्येक जण आधार नोंदणी करू शकतो. आधार तपशील अद्ययावत ठेवणे देखील गरजेचे असते. आधार नोंदणी व अद्ययावतीकरणाच्या सेवांमध्ये मात्र १ ऑक्टोबरपासून मोठी वाढ केली. विद्यार्थी, शेतकरी, लाडक्या बहिणींसह सर्वसामान्य नागरिकांना त्याचा चांगलाच आर्थिक भूर्दंड सहन करावा लागत आहे. नवीन दर ३० सप्टेंबर २०२८ पर्यंत लागू असतील. नवीन आधार नोंदणी ही पूर्वी प्रमाणे मोफत आहे. ५ ते १७ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठीबायोमेट्रिक अद्ययावतीकरण देखील मोफत ठेवण्यात आले. इतर बायोमेट्रिक अद्ययावतीकरणाचे शुल्क आता १२५ रुपये करण्यात आले आहे.





पूर्वी ते १०० रुपये होते. 'डेमोग्राफिक' अद्ययावत आधार केंद्रामध्ये किवा ऑनलाइन ७५ रुपये, जेपूर्वी ५० रुपयेहोते. पत्याचा पुरावा, ओळखीचा पुरावा, दस्तऐवज अद्ययावत आधार नोंदणी केंद्रामध्ये किवा पोर्टलवरील शुल्क आता ५० ऐवजी ७५ रुपये आकारण्यात येत आहे.ई-केवायसी, आधार शोध व रंगीत प्रिंट दर सुद्धा ३० वरून ४० रुपयांवर नेण्यात आले. या वाढलेल्या दरामुळे नागरिकांवरअतिरिक्त आर्थिक भार पडला आहे. ५० रुपयांचे शुल्क थेट ७५ रुपयांवर नेऊन शुल्कामध्ये ५० टक्क्यांपर्यंत, तर १०० रुपयांवरून १२५ रुपये शुल्क आकारत २५ टक्क्यांपर्यंत दरवाढ केली. या दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये नाराजी दिसून येत आहे.

(बॉक्स)सुधारित दराचे फलक लावणे बंधनकारक

सुधारित दरांचे फलक आधार केंद्रावर दर्शनी भागावर स्पष्टपणे लावणे केंद्र चालकांना बंधनकारक

#### १ ऑक्टोबर २०२५ पासून सेवांसाठी सुधारित दर निश्चित

करण्यात आले आहे. १ ऑक्टोबर २०२५ पासून सुधारित दरानुसारच शुल्क आकारले जात आहे. नागरिकांकडून अतिरिक्त शुल्क आकारल्यास कठोर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक व जिल्हा प्रशासनाच्या सूचनांचे पालन बंधनकारक असल्याच्या सूचना देखील दिल्या आहेत. नागरिकांनी आधार केंद्र चालकाविरुद्ध तक्रार असल्यास संबंधित तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालयातील आधार शाखायेथे तक्रार दाखल करता येणार आहे.-

## सामुदायिक प्रार्थना ही विश्व शांतीच्या कल्याणासाठी- ॲड. स्वप्निल महल्ले

### गुरुकुंज मोझरी येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा ५७ वा पुण्यतिथी महोत्सव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७गुरुकुंज मोझरी-** वैदीक काळापासून दोन प्रकारच्या प्रार्थना भारत देशात होत आहे. एक वैयक्तिक प्रार्थना व दुसरी सामुदायिक प्रार्थना. वैयक्तिक प्रार्थना आपल्या स्वतःच्या कल्याणासाठी करित असतो, तर सामुदायिक प्रार्थना ही विश्व शांतीच्या कल्याणासाठी असते. राष्ट्रसंतांच्या विचारात विश्वशांतीचा संदेश आहे. त्यांनी विश्व के चालक प्रभू मुझे समझ दे विश्वकी, हा ताकतीचा विचार सांगितला आहे, असे प्रतिपादन ॲड. स्वप्निल महल्ले यांनी केले. गुरुकुंज मोझरी येथे ५७ व्या पुण्यतिथी महोत्सवाला उत्साहात सुरुवात झाली. यावेळी ड. महल्ले यांनी सामुदायिक प्रार्थनेवरील चिंतनात मार्गदर्शन केले.

ते पुढे म्हणाले की, सध्या जगात अनेक ठिकाणी लहान मोठी युद्ध होत आहेत. त्यामुळे अशांततेचा वातावरण निर्माण झाले आहेत. यामुळे तरी आपल्याला असे वाटत असले की, आपण सुरक्षित आहोत, परंतु उत्पादन असो की सेवा त्याची झळ भारत देशाला सुद्धा बसते. म्हणून विश्वाचे कल्याण होण्यासाठी जगाला शांततेची गरज असते. शिवाजी महाराजांच्या काळापासून तर स्वातंत्र्यापर्यंत आपल्याला मुलभूत बाबींसाठी झगडावे लागले. परंतु, पाश्चिमात्य देशात न्यूटनसारखे शास्त्रज्ञ होऊन गेल्यामुळे त्यांनी मानव कल्याणाच्या



वेगळ्या वळणावरती व प्रगतीकडे घेऊन गेले. आजही भारतामध्ये बौद्धिक संपदेची कमतरता नाही. परदेशी लोक भारतीय बौद्धीक संपदा वापरून त्यांचा विकास साधून घेतात. दुसऱ्या महायुद्धात जपान देश पूर्णतः उद्धवस्त झाला होता. परंतु, त्या देशातील जनतेने मिरर आणि विंडो ही पद्धती स्वीकारून जपानला प्रगती पथावर घेऊन गेले. एकदा मिळालेले मानवी जीवन स्वर्गमय करायचे असेल तर या जीवनाला मूलभूत प्रश्नात न अडकता, मानव जन्माचे कल्याण करायचे आहे. तर आपल्याला सुद्धा जपानची मिरर व विंडो पद्धत स्वीकारावी लागेल. मिरर पद्धतीचा अर्थ असा की, झालेल्या चुका दुरूस्त करून प्रगती साधणे व विंडो पद्धती म्हणजे आपल्या हातून कुठले सत्कार्य घडत असेल, तर माझ्या गुरुंनी केले. सामुदायिक प्रार्थना जगाला तारणार आहे, हा विचार जगातील जनतेपर्यंत पोहचण्यासाठी वर्षानुवर्ष लागणार आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची सामुदायिक प्रार्थना विश्व शांतीसाठी तुम्हा-आम्हाला पूरक आहे. विश्वी होऊ शकेल, शांतता तेथे गावाची काय कथा सामुदायिक प्रार्थना करेल, एकता नित्यासाठी तुकड्या म्हणे, असे प्रतिपादन ॲड. महल्ले यांनी केले.

# शासकीय रुग्णालयांना चक्क बोगस औषधांचा पुरवठा, स्थानिक पातळीवर खरेदी

## महाराष्ट्रासह परप्रांतातील कंपन्यांचा सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती-** कफ सिरपमुळे बालकांचा मृत्यू झाल्याच्या घटनेने आरोग्य यंत्रणा खडबडून जागी झाली. कुठे बोगस औषधांचा पुरवठा झाला का, यादृष्टीने अन्न व औषध प्रशासन विभागाकडून शासकीय, निमशासकीय रुग्णालयातून औषधांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले होते. याची विभागाच्या प्रयोगशाळेत तपासणी करण्यात आली. यामध्ये स्थानिक पातळीवर खरेदी केलेली औषधी बोगस असल्याचे विश्लेषकांनी घोषित केले. खरेदी केलेले औषधे महाराष्ट्रासह परप्रांतातील कंपन्या आणि चिल्लर विक्रेत्यांनी पुरविल्या आहेत.

**शासनाच्या पत्रात नावे**

अन्न व औषध प्रशासन विभागाच्या औषध निरीक्षकांनी काढलेल्या निष्कर्षात संबंधित औषधांचे मूळ घटकच त्यामध्ये नसल्याची बाबही पुढे आली. औषधांची खरेदी स्थानिक पातळीवर शासकीय, निमशासकीय रुग्णालयांमध्ये करण्यात आली. बोगस औषधांच्या पुरवठ्यातील घाऊक विक्रेता ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथील मे. एक्टिव्हेंटिस बायोटेक प्रा. लि. आहे. या वितरकाच्या घेण्यात आलेल्या नमुन्यांपैकी १५ नमुने बनावट असल्याचे आढळले. शासनाच्या पत्रात कंपन्यांची नावे देण्यात आली आहेत. मे. स्टिफन फॉर्म्युलेशन (उत्तराखंड), मे. रिफंट फार्मा प्रा.लि. (केरला), मे. ग्रिष्टल फॉर्म्युलेशन्स (उत्तराखंड), मे. बायोटेक फॉर्म्युलेशन (आंध्र प्रदेश), मे. मेलवॉन बायोसायन्सेस (केरला), मे.



स्काय क्यूअर सोल्यूशन्स (केरला), मे. एस. एम. एन. लॅब्स लि. देहरादून (उत्तराखंड), मे. श्री. ग. लॅब लि. डेहराडून (उत्तराखंड). आरोग्य विभागाने ई-निविदाअंती खरेदी करून औषधांचा रुग्णालयांना पुरवठा केला. त्यांचे नमुने विश्लेषणार्थ घेण्यात आले. त्यापैकी १५ नमुने बनावट आढळले, असे अन्न व औषध प्रशासन आयुक्त राजेश मावेकर यांनी ४ जुलैला पत्राद्वारे आरोग्य सेवा संचालनालयाच्या आयुक्तांना कळविले. त्याअनुषंगाने आरोग्य सेवा आयुक्तालयाचे सहसंचालक (खरेदी कक्ष) डॉ. उमेश शिरोडकर यांनी ३ ऑक्टोबरला राज्यातील जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकार्यांना एका पत्राद्वारे बनावट औषधीबाबत अलर्ट केले आहे. बनावट औषध पुरवठा करणार्या एजन्सी, पुरवठादारांची यादीही पाठविली.लेबल वेगळे, औषधांचे मूळ घटक नव्हते विश्लेषकांच्या अहवालानुसार लेबल वेगळे आणि औषधांचे मूळ घटक नव्हते. औषध निरीक्षकांद्वारे झालेल्या तपासणीत औषधांच्या लेबलवर नमूद उत्पादक हे अस्तित्वात नाहीत, असे निदर्शनास आले आहे.

### बोगस औषधी पुरविणारे चिल्लर विक्रेते

जया एंटरप्रायजेस लातूर, विशाल एंटरप्रायजेस कोल्हापूर, एक्टिवेटिस बायोटेक प्रा.लि. भिवंडी (जि. ठाणे), केंबिज जेनेरिक हाऊस मीरा रोड ठाणे, ग्लाशिअर फार्मा प्रा. लि. अमरावती, राजेश फार्मा प्रा. लि. अमरावती, मिल्टन जनरिक प्रा.लि. कालबादेवी रोड मुंबई, श्री गणेश फार्मा अँड सर्जिकल एलएलपी मीरा रोड ठाणे याशिवाय पुणे येथील प्रतिमानगरातील प्रतिमा फार्मास्युटिकल यांची औषधेही बनावट असल्याचे आढळले.

# यावली परिसरातील संत्रा उत्पादक शेतकरी अतिवृष्टीमुळे आर्थिक संकटात

## जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन,नुकसानभरपाईची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७नांदगाव पेठ-**

यावली शहीद, नरसिंगपूर, भगवानपूर, भारतपूर, देवापूर, औरंगपूर परिसरात गेल्या वीस ते पंचवीस दिवसांपासून झालेल्या अतिवृष्टीमुळे संत्रा फळबागांवर मोठे संकट कोसळले आहे. सततच्या धार पावसामुळे फळबागांमध्ये बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होऊन मोठ्या प्रमाणात फळगळ झाली असून संत्रा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.नुकतेच परिसरातील शेकडो शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय येथे निवेदन देऊन नुकसानभरपाईची मागणी केली आहे.

पावसामुळे जमिनीत पाणी साचल्याने फळांची झड वाढली आहे. गावाच्या शिवारात पडलेल्या संत्रा फळांचा सडा पाहून शेतकरी अक्षरशः खचून गेले आहेत.

अनेक बागांमध्ये झाडांवर फळे नसल्यासारखी अवस्था निर्माण झाली असून, शेतकऱ्यांचा मेहनतीचा सर्व हिशोब कोलमडला आहे.यात भर म्हणजे, बागेतून उरलेली फळे बाहेर काढण्यासाठी योग्य पांदन रस्ते नसल्याने अडचणी वाढल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची शेवटची आशा सुद्धा मावळली आहे.

या फळगळतीमुळे झालेल्या प्रचंड आर्थिक नुकसानीची शासनाने दखल घ्यावी, तसेच नुकसानभरपाई देऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी संत्रा उत्पादकांनी केली आहे. यावली व परिसरातील शेतकऱ्यांनी नुकतेच जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय तसेच तालुका कृषी अधिकारी कार्यालय, अमरावती येथे निवेदन सादर केले. शेतकऱ्यांनी



निसर्गाच्या या आघातातून सावरण्यासाठी शासनाने तत्काळ पंचनामे करून योग्य ती नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी मागणी केली आहे.निवेदन देताना यावली येथील उपसरपंच नितीनराव पाचघरे, तुषार खवले, गजानन देशमुख, विजय घाटोळ, सतीश उमाप, संजय वाघ, साहेबराव पोजगे, विनोद मनगटे, घनश्याम लोने, प्रशांत घाटोल, अवधूत उमप, रामभाऊ सरकटे तसेच परिसरातील इतर संत्रा उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांतील अध्यापकांच्या भरती प्रक्रियेस मान्यता

## - उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७मुंबई,** राज्यातील सार्वजनिक (अकृषि) विद्यापीठांमधील अध्यापकांची निवड प्रक्रिया अधिक पारदर्शक, निपक्ष आणि संतुलित व्हावी, यासाठी मा. कुलपती तथा राज्यपाल महोदयांच्या कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या निर्देशांनुसार कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. या कार्यपद्धतीनुसार विद्यापीठातील अध्यापकांच्या भरती प्रक्रियेस मान्यता देण्यात येत आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

उच्च शिक्षण संस्थांमधील अध्यापकांकरिता विद्यापीठ अनुदान आयोगाकडून शैक्षणिक अर्हता आणि अनुषंगिक बाबी विहित करण्यात येतात. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून १८ जुलै २०१८ च्या अधिसूचनेनुसार विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील अध्यापकांच्या नियुक्तीसाठी आवश्यक किमान अर्हता आणि उच्च शिक्षणातील दर्जा कायम ठेवण्यासाठीच्या आवश्यक उपाययोजना आणि कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. या अधिसूचनेतील तरतुदी उच्च



व तंत्र शिक्षण विभागाच्या ८ मार्च २०१९ च्या शासन निर्णयानुसार राज्यात लागू करण्यात आल्या आहेत. २८ फेब्रुवारी २०२५ च्या शासन निर्णयानुसार अध्यापकांची निवड प्रक्रिया राबविण्याबाबत कार्यपद्धती विहित करण्यात आली होती. ही निवड प्रक्रिया अधिक पारदर्शक, निष्पक्ष आणि संतुलित व्हावी यासाठी त्यात सुधारणा करण्यात आली आहे.सार्वजनिक (अकृषि) विद्यापीठांमधील सध्या सुरू असलेल्या अध्यापक व सांविधिक पदांच्या निवड प्रक्रिया नव्या कार्यपद्धतीनुसार पूर्ण करण्यात येणार असून भविष्यात होणाऱ्या सर्व भरती प्रक्रियेसाठी याच कार्यपद्धतीचा अवलंब करणे बंधनकारक असणार आहे, असेही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.याबाबत चा शासन निर्णय www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला आहे.

**अध्यापकांच्या भरती प्रक्रियेमध्ये अधिक पारदर्शकता आणण्यासाठी कार्यपद्धती निश्चित**

# ग्रामरोजगार सहाय्यकांचे उपोषण पाचव्या दिवशीही सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती-** ग्राम रोजगार सहाय्यक श्रावण बोकडे यांनी गेल्या वर्षी ३ ऑक्टोबर रोजी जारी झालेल्या जीआरनुसार मानधन देण्याच्या मागणीसाठी बेमुदत उपोषण सुरू केले आहे. उपोषणाचा आज पाचवा दिवस असून, प्रशासनाने दखल न घेतल्याने ८ ऑक्टोबरपासून आंदोलनात सहभागी होणाऱ्यांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या निर्णयानुसार, तालुका स्तरावरील ग्राम रोजगार सहाय्यकही आंदोलनात सहभागी होणार आहेत. दरम्यान, सोमवारी दुपारी प्रशांत लोणारे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हा परिषदेच्या प्रभारी सीईओ प्रीती देशमुख यांची भेट घेतली. या भेटीत स्थानिक पातळीवरील मुद्दे सोडवण्याचे आश्वासन देशमुख यांनी दिले.

ग्राम रोजगार सहाय्यकांना पूर्णवेळ कर्मचाऱ्यांचा दर्जा देणे, त्यांची नियुक्ती आणि सेवा समाप्तीचे अधिकार जिल्हा



प्रशासनाला देणे, तसेच दुर्गम भागातील ग्राम रोजगार सहाय्यकांना इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे विशेष दर्जा देणे या मागण्याही यावेळी मांडण्यात आल्या. या मागण्या शासकीय धोरणाशी संबंधित असल्याने त्यावर धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

आंदोलनकर्त्यांच्या मते, अनेक दिवसांपासून या मागण्यांसाठी आंदोलन सुरू असल्याने शासनाने त्यांच्या अखत्यारातील निर्णय तातडीने घेतले पाहिजेत. अमरावती येथून सुरू झालेला हा लढा राज्यभर नेण्याचे प्रयत्नही सुरू झाले आहेत. सोमवारी जिल्हाभरातील ग्राम रोजगार सहायकांनी बोकडे यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी अमरावतीत हजेरी लावली. प्रशांत लोणारे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उपस्थितांना संबोधित केले.

# अनाथ असली, दृष्टी नसली तरी अंधारमय आयुष्यात तीने लावला दिवा!

## मालाच्या यशाने जिल्हाधिकारीही गेले भारावून

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७नागपूर-** नाव- माला शंकरबाबा पापळकर. ती जन्मत: दृष्टिहीन अन् अनाथ. जळगावात कचराकुंडीतून उचलून आणलेले ते रोपटे पद्मश्री शंकरबाबा पापळकर यांनी अमरावती जिल्ह्यातील वझ्झर येथील अनाथाश्रमात रूजविले, संगोपन केले. ब्रेल लिपी व आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने ती राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाली. सोमवारी नागपूर



जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल सहाय्यक पदावर रूजू झालेल्या मालाचे असे देवदुर्लभ स्वागत झाले की, तिच्यासारख्या हजारो, लाखो अनाथ. निराधार तरूण-तरूणींच्या मनांमध्ये प्रेरणेचे दीप उजळून निघावेत.

एरव्ही रूक्ष सरकारी कोंदटपणा अनुभवणाऱ्या जिल्हा कचेरीत सोमवारची सकाळ आगळीवेगळी होती. स्वत: शंकरबाबा आणि वझ्झर आश्रमातील त्यांची मुले-मुली आनंदी चेहऱ्याने मालाच्या कर्तबगारीचे साक्षीदार बनण्यासाठी उपस्थित होते. या सर्वांच्या स्वागताला जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटकर, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे व इतर सज्ज होते. खुद्द महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सायंकाळी तिची भेट घेऊन मालाच्या नव्या प्रवासाला शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र शासनाने शनिवारी, ४ ऑक्टोबरला अनुकंपा व सरळसेवा भरतीद्वारे नागपूरमधील ९४१ उमेदवारांसह राज्यभरातील १० हजार ३०९ उमेदवारांना शासन सेवेतील नियुक्तीचे आदेश दिले. महसूल सहाय्यक माला पापळकर ही त्यापैकी एक. तिच्या रूजू होण्याच्या निमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालय जणू भावविभोर झाले होते. पापळकर यांच्या संस्थेला वेळोवेळी सहकार्य करणारे ज्येष्ठ संपादक श्रीमंत माने, सौ. प्राप्ती माने, रोटरी क्लबचे पदाधिकारी व विविध सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी आवर्जून उपस्थित होते.

### महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मालाला दिल्या अनोख्या शुभेच्छा

राज्याचे महसूलमंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी सायंकाळी जिल्हाधिकारी कार्यालयातील गृह शाखेत माला पापळकरच्या जागेवर जाऊन तिला शुभेच्छा दिल्या. 'तुझ्यामधे असलेल्या सुप्त गुणांना ओळखून कामाची जबाबदारी देवू' असे त्यांनी सांगून तिच्या मनोबलाला उंचावले. यावेळी त्यांच्यासोबत जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर होते.

# नागपूरसह विदर्भातही काही बालकांच्या मृत्यूच्या संशयित घटना

## महाराष्ट्र सरकारचा मोठा निर्णय; साठा सापडल्यास तत्काळ कळवण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७नागपूर-** मध्य प्रदेश आणि राजस्थानमधील चिमुकल्यांच्या मृत्यूमुळे देशभरात एकच खळबळ उडाली आहे. 'कोल्ड्रिफ' या खोकल्याच्या औषधामुळे विषबाधा होऊन एकूण १७ लहान मुलांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या घटनांनंतर महाराष्ट्र सरकारने तात्काळ हालचाल करत, राज्यातील नागरिक आणि मेडिकल दुकानदारांना सावध राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाने तातडीने एक टोल फ्री क्रमांक सुरू केला असून, या औषधाचा कोणताही साठा सापडल्यास तत्काळ कळवण्याचे आवाहन केले आहे. तसेच 'कोल्ड्रिफ' सिरपची विक्री, वितरण आणि वापर पूर्णपणे थांबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या औषधात अत्यंत धोकादायक असा डायथिलीन ग्लायकोल हा रासायनिक घटक आढळून आल्याचे प्रयोगशाळेच्या तपासणीत स्पष्ट झाले आहे. तामिळनाडूच्या कांचीपुरम येथील युनिटमध्ये बनवलेल्या या सिरपमध्ये ४८.६ टक्के डायथिलीन ग्लायकोल असल्याचे निष्पन्न झाले. हा घटक सामान्यतः औषधनिर्मितीत ०.१ टक्क्यांपेक्षा जास्त प्रमाणात असू नये. पण कोल्ड्रिफ सिरपमध्ये त्याचे प्रमाण जीवघेणे ठरले आहे. तज्ज्ञांच्या मते, हा रसायन शरीरात





गेल्यावर मूत्रपिंड, यकृत आणि मज्जासंस्था निकामी करते. त्यामुळेच या सिरपचे सेवन केलेल्या बालकांचा मृत्यू मूत्रपिंड निकामी झाल्यामुळे झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मध्य प्रदेशात १४, राजस्थानात ३ बालकांचा मृत्यू

मध्य प्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यात १४ चिमुकल्यांचा आणि राजस्थानात ३ मुलांचा या सिरपच्या सेवनानंतर मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर मध्य प्रदेश सरकारने 'कोल्ड्रिफ कफ सिरप' वर तत्काळ बंदी घातली असून, सिरप तयार करणाऱ्या कंपनीच्या विरोधात गंभीर निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कंपनीच्या अधिकाऱ्यांवर कारवाईसह एका डॉक्टरलाही अटक करण्यात आली आहे. तपास यंत्रणांनी सांगितले की, मृत मुलांपैकी बहुतेकांना हे सिरप ताप आणि खोकल्यासाठी दिले गेले होते.

पण काही तासांतच त्यांना उलट्या, मूत्र विसर्जन बंद होणे, आणि कोमासारखी लक्षणे दिसू लागली. हे दृश्य पालकांसाठी भयावह ठरले. या घटनेनंतर देशभरातील पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### केंद्र सरकार आणि महाराष्ट्राचा 'अलर्ट मोड'

या घटनांची दखल केंद्र सरकारने गंभीरतेने घेतली असून, सर्व राज्यांना तत्काळ सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत. महाराष्ट्र, केरळ आणि तामिळनाडू सरकारने आपापल्या हद्दीत औषध दुकाने, घाऊक विक्रेते आणि रुग्णालयांवर छापेमारी सुरू केली आहे. महाराष्ट्रात अन्न व औषध प्रशासन विभागाने बॅच क्रमांक डठ-१३ असलेले औषध सर्वत्र शोधून जप्त करण्याचे आदेश दिले आहेत. नागपूर, नाशिक, मुंबई आणि औरंगाबादमध्ये या औषधाचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. राज्य सरकारने नागरिकांना आवाहन केले आहे की, जर त्यांच्या घरी 'कोल्ड्रिफ' सिरप असेल, तर ते औषध तात्काळ वापरात आणू नये आणि टोल फ्री क्रमांकावर (१८००-२२२-३६५) संपर्क साधावा.

# तळेगाव ठाकूर येथे भुलाबाई हा सन सामूहिक पद्धतीने साजरा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.७तिवसा**

तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकूर येथे सामूहिक पद्धतीने भुलाबाई हा सन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कोजागिरी पौर्णिमेला महाराष्ट्रातील, विदर्भात भुलाबाई हा सण साजरा करण्यात येतो. कोजागिरी पौर्णिमेच्या एक महिने पहिल्यापासून स्त्रिया आणि लहान मुली घरोघरी भुलाबाई बसवतात , त्यावेळी भुलाबाईचे गाणी , खेळ व प्रसाद हे सगळ्याचे आयोजन असते.एका लिंबू झेलू बाई दोन लिंबू झेलू असे अनेक भुलाबाई चे गाणी लहान मुलींकडून गायली जातात.भुलाबाई बसवणे आणि भुलाबाईची गाणी आताच्या वातावरणात लुप्त होत आहे, परंतु ग्रामीण भागात अजूनही भुलाबाईचे गाणी लहान मुली गाताना दिसतात.अलीकडच्या काळात केवळ कोजागिरी पौर्णिमेलाच भुलाबाई बसवून परिसरातील लहान मुली एकत्र येऊन त्यांची गाणी गातात ,प्रसाद ओळखण्याचा खेळ खेळतात, टिपऱ्यांचा खेळ . दुसऱ्या दिवशी गुलाबाईंचे विसर्जन केले जाते.भुलाबाई म्हणजे शंकर-पार्वती चे रूप .आहे ,एक पोरावनिक कथा अनुसार भुलाबाई बसवणे म्हणजे, पार्वती माता भोलेनाथ सोबत माहेरी यायची तेव्हा पूर्ण घर आनंदाने खिळखुळं उठायचं, तेव्हा घरचे सगळे एका सोबत येऊन गाणी गायचे खेळ खेळायचे.विदर्भात भिल्लनी आपल्या पतीसोबत म्हणजे शंकरा सोबत माहेरी आली आहे असं म्हणतात. म्हणून अनेक मराठी गाणी मध्ये भिल्लनी या शब्दाचा उपयोग दिसतो.

# खरिपाचे पीककर्ज वाटप ८३ टक्क्यांवर थांबले

## ९४ हजार ६६४ शेतकऱ्यांना १३७४ कोटी ४७ लाखांचे पीककर्ज वाटप



**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

जिल्हा प्रशासनाने लीड बँकेच्या माध्यमातून केलेल्या खरिपाचे पीककर्ज वाटप थांबले आहे. सहा महिन्यांत ९४ हजार ६६४ शेतकऱ्यांना १३७४ कोटी ४७ लाखांचे पीककर्ज वाटप करण्यात आले असून याची टक्केवारी ८३ टक्के एवढी आहे. यामध्ये खासगी बँकांचा मात्र कर्ज वाटपाला 'नो रिस्पॉन्स' दिसून आला. आठ बँकांनी के वळ ३५ टक्के कर्ज वाटप केले आहे. यातील तीन बँकांनी कर्जच वाटले नाही.जिल्ह्यात २ लाख २५ हजार शेतकऱ्यांना १६५० कोटी रुपयांचे पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट २० बँकांना देण्यात आले होते. यामध्ये ११ राष्ट्रीयीकृत, ८ खासगी, एक ग्रामीण आणि एक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा समावेश होता. १ एप्रिलपासून खरिपाच्या पीककर्ज वाटपाला या बँकांनी सुरुवात केली. ३० सप्टेंबर म्हणजे या सहा महिन्यांत २० बँकांनी ९४ हजार ६६४ शेतकऱ्यांना १३७४ कोटी ४७लाखांचे पीककर्ज वाटले आहे. या बँकांना यंदा उद्दिष्टपूर्ती करता आली नाही. ८३ टक्के कर्ज वाटप करण्यास बँका यशस्वी झाल्या आहेत. ११ राष्ट्रीयीकृत बँकेने सर्वाधिक ८९ टक्के कर्ज वाटले आहे. त्या पाठोपाठ एकटच्या जिल्हा मध्यवर्ती बँकेने ८६ टक्के कर्ज वाटपचे उद्दिष्ट पूर्ण केले आहे. ग्रामीण बँकेने ५५ टक्के तर आठ खासगी बँका कर्ज वाटपात चांगल्याच माघारल्या. या बँकांनी केवळ ३५ टक्केच कर्ज वाटप केले.

**रब्बीत साडेचारशे कोटींच्या कर्जवाटपाचे उद्दिष्ट**

१ ऑक्टोबरपासून रब्बीच्या कर्जवाटपाचे नियोजन करण्यात आले आहे. १ मार्चपर्यंत याचे कर्ज वाटप केले जाणार आहे. याकरिता ४८ हजार ३०० शेतकऱ्यांना ४५० कोटी रुपयांच्या पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.

# नवजात अर्भक बाल आढळून आले मृत अवस्थेत

## वलगाव पोलीस स्टेशन हद्दीत घडली धक्कादायक घटना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ वलगाव**

अमरावती जिल्ह्यातील थुगाव येथे दिनांक पाच ऑक्टोंबर रविवार रोजी सकाळी अकराच्या सुमारास धक्कादायक घटना घडली आहे अनैतिक संबंधातून जन्माला आलेलं पुरुष जातीच अर्भक हे मृत अवस्थेत गावात आढळून आलेलं आहे गावातील दोन व्यक्ती हे कामानिमित्त गावातून बाहेर जात असताना त्यांना मृत अवस्थेत असलेल अर्भक गावातील नालीतून कुत्रे ओढून त्याला खात आहे असे आढळून आले दोन्ही युवकांनी लगेच गावातील असलेल्या पोलीस पाटील यांना माहिती दिली पोलीस पाटील यांनी तात्काळ वलगाव पोलीस स्टेशन येथे माहिती दिली वलगाव पोलिसांनी घटनेच गांभीर्य लक्षात घेत तात्काळ घटनास्थळी धाव घेतली व कसून चौकशी चालू केली असता नवजात अर्भक हे पुरुष जातीचे आढळून आले आहे अर्भकाच्या अंगावर कुठलेही कपडे नव्हते अशातच नवजात अर्भकाच्या शरीराचा वरचा भाग हा डोकं डोळे हात पोट हे कापलेल्या अवस्थेत आढळून आले आहे सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार अनैतिक संबंधातून पुरुष जातीचे अर्भक बाळ हे जन्माला आले व त्याची हत्या करण्यात आली आहे असा संशय व्यक्त केल्या जात आहे वलगाव पोलिसांनी मृतक नवजात अर्भकाला म्बुलन्सच्या



मदतीने सविच्छेदना साठी अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले असून शवविच्छेदन अहवालातून नेमकं काय सत्य समोर येते हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे मृतक नवजात अर्भकाच्या शरीराचे तुकडे झाले असल्यामुळे वलगाव पोलिसांनी त्याचा हिंदू स्मशानभूमी येथे विधिवत दफन विधी केला आहे या संपूर्ण घटनेमुळे थुगाव गाव हादरलं आहे मृतक नवजात अर्भकाच्या जन्मदात्या आई व वडिलांचा पोलीस शोध घेत आहे पुढील तपास वलगाव पोलीस करत आहे.

# नारी शक्तीरंगात रंगले महिला महाविद्यालय

## आंतर शालेय गटातून समर्थ विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी प्रथम पारितोषिक





**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळ द्वारा संचालित महिला महाविद्यालय जोग चौक, अमरावती यांच्या वतीने दि.४ व ५ ऑक्टोबरला शक्तीरंग-२०२५ आंतर महाविद्यालयीन व आंतरशालेय भव्य गरबा नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ५ ऑक्टोबरला आंतर शालेय गरबा स्पर्धा घेण्यात आली.या स्पर्धेत अमरावतीतील विविध शाळेतील विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता, त्यांच्या पारंपारिक गरबा पोशाखातील नृत्य सादरीकरणाने महिला महाविद्यालयाचा संपूर्ण परिसर गरब्याच्या जल्लोषात रंगून गेला. समारंभाच्याअध्यक्षस्थानी नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे ज्येष्ठ उपाध्यक्ष मा. सुभाष कसबेकर उपस्थित होते तर उद्धाटक म्हणून समाजसेविका प्रीतीताई बंड तसेच प्रमुख अतिथी म्हणून माननीय प्रा. डॉ .आनंद देशमुख (तक्षशिला महाविद्यालय) व रश्मी नावंदर तसेच नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे सचिव मा. हितेश व्यास उपस्थित होते. महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य मा. डॉ. अरुणा वाडेकर यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले की,या स्पर्धेतूनविद्यार्थिनींना नारीशक्तीचा संदेश द्यायचा आहे. समाजसेविका प्रीतीताई बंड यांनी आपले विचार व्यक्त करताना प्रतिपादन केले की, विद्यार्थिनींनी निर्भयपणे येणाऱ्या अडचणींवर मात करत पुढे जावे परंतु आपले संस्कार आणि आपल्याला सक्षम बनवणाऱ्या आदर्श व्यक्तीचा विसर पडू देऊ नये तसेच आई आपली जवळची मैत्रीण असते,तिचा सन्मान करावा. रश्मी नावंदर यांनी आजची स्त्री ही निर्णय घेण्यास सक्षम असून महिला महाविद्यालय हे स्त्रियांच्या उन्नती करिता दूरदृष्टी ठेवून नवनवीन उपक्रम राबवत असते असे सांगितले. प्रा. डॉ. आनंद देशमुख यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी योग्य दिशा निवडून त्यावर मार्गक्रमण करावे असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे जेष्ठ उपाध्यक्ष मा. डॉ. सुभाष कसबेकर यांनी महाविद्यालयात घेण्यात येणाऱ्या या स्पर्धेचे महत्त्व विशद करून कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल शुभेच्छा दिल्या व अभिनंदन केले. याप्रसंगी व्यासपीठावर पर्यवेक्षिका माधुरी सोनपरोते प्रा. ममता पांडे उपस्थित होत्या.या स्पर्धेत अमरावती मधील विविध शाळेतील विद्यार्थिनींनी सहभाग घेऊन सर्व स्पर्धकांनी गरब्याच्या पारंपारिक वैविध्यपूर्ण पोशाख परिधान करून रोषणाई केलेल्या भव्य मंडपात उत्कृष्ट सादरीकरण करून सर्व प्रेक्षकांना गरबा नृत्याचा अप्रतिम आनंद देऊन मंत्रमुग्ध केले. या स्पर्धेचे पारदर्शकपणे परीक्षण सीमा वानखडे, जान्हवी काळे व विजयालक्ष्मी राज यादव यांनी केले. प्रथम पारितोषिक मिलिंद मानकर यांच्याकडून देण्यात आले, द्वितीय पारितोषिक श्री प्रवीण मसराम यांच्याकडून देण्यात आले,तृतीय पारितोषिक रश्मी नावांदर यांच्याकडून देण्यात आले, तर उत्तेजनार्थ पारितोषिक महाविद्यालयाच्या प्रा. जयश्री पोकळे यांच्याकडून देण्यात आले. या स्पर्धेकरिता मा. किशोरजी निवल मा. मनोजजी निवल प्रा. वर्ष साबळे आणि चित्रलेखा देशमुख यांच्यातर्फे सर्व सहभागी स्पर्धकांना तसेच त्यांच्यासह आलेल्या शिक्षक प्रतिनिधींना भेटवस्तू देण्यात आल्या. आंतर शालेय गटातून समर्थ विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी प्रथम पारितोषिक प्राप्त केले,द्वितीय पारितोषिक नूतन कन्या शाळेने, तृतीय पारितोषिक महिंद विद्यालय व उत्तेजनार्थ स्कूल ऑफ स्कॉलर्स या शाळेने प्राप्त केला. विजेत्या स्पर्धकांना महाविद्यालयाच्या वतीने स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.बक्षीस वितरण समारंभाचे प्रमुख अतिथी नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे सहसचिव मा. श्री. अतुल बिजागरे यांनी आयोजित गरबा स्पर्धा ही महिला महाविद्यालयाच्या एकसष्टीची नांदी असून असे उपक्रम घेण्यास कार्यकारणी कायम पाठिंबा देत राहील असे प्रतिपादन केले. या प्रसंगी प्रा.ममता पांडे यांनी शक्ती रंग या नावातच स्त्रीशक्ती, स्त्री सामर्थ्य असून हा उपक्रम महाविद्यालयाला प्रेरणादायी आहे असे सांगितले. बक्षीस वितरण समारंभाचे अध्यक्ष. श्री. अविनाश मांडेकर माजी नगरसेवक ,माजी सभापती स्थायी समिती अमरावती यांनी संस्थेप्रती आपला विश्वास दाखवून अशा नाविन्यपूर्ण उपक्रमास कायम सहयोग राहील अशी भावना व्यक्त केली. या सोहळ्यात प्रमुख उपस्थिती म्हणून विलास इंगोले माजी महापौर,डॉ.रसिका राजनेकर आशिष अतकरे माजी नगरसेवक, चंद्रकांत पोपट संचालक रघुवीर मिठाई, सुरेखा लुंगारे समाजसेविका व माजी नगरसेवक, श्रीमान मिलिंद मानकर (सचिव मुंगसाजी महाराज बहुउद्देशीय संस्था), सौ. सारिका निवल व सौ. प्रीती निवल उपस्थित होत्या. तसेच श्री रवी देशमुख संचालक क्षितिज पॅलेस यांचे मोलाचे योगदान स्पर्धेला लाभले.उद्घाटन समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. अपर्णा तिनखेडे यांनी केले. गरबा स्पर्धेचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.जयश्री पोकळे यांनी केले. बक्षिस वितरण समारंभाचे सूत्रसंचालन प्रा.कांचन परतेकी यांनी केले.या गरबा स्पर्धेचे आयोजन महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.अरुणा वाडेकर, पर्यवेक्षिका माधुरी सोनपरोते व प्रा. ममता पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांच्या अथक प्रयत्नांनी व कर्मचाऱ्यांच्या सहकार्यांनी शक्ती रंग - २०२५ भव्य गरबा स्पर्धा यशस्वीरित्या संपन्न झाली. या कार्यक्रमाच्या संपूर्ण आयोजनाकरिता प्रतिष्ठित व्यक्तींचे आर्थिक सहकार्य लाभले.कार्यक्रमाला अमरावती शहरातील विविध महाविद्यालयातील व शाळेतील विद्यार्थिनीं, शिक्षक ,पालक व नामांकित व्यक्तींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेद्वारे देवीची आराधना करून नारीशक्तीला वंदन करण्यात आले. गरबा स्पर्धेच्याआयोजना करता नूतन विदर्भ शिक्षण मंडळाच्या संपूर्ण कार्यकारिणीने महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

# समाजसेविका रुबीना परवीन द्वारा आयोजित ब्युटी पार्लर प्रशिक्षण यशस्वीरीत्या संपन्न



**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

समाजसेविका रुबीना परवीन जावेद अहमद जमदार यांच्या पुढाकाराने आयोजित १५ दिवसीय ब्युटी पार्लर प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. गुलशन स्पोर्टिंग सोसायटी व महिला व बालविकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या या प्रशिक्षणाचा प्रशस्तीपत्र वितरण समारंभ आज युसुफ पॅलेस, अमरावती येथे पार पडला.

या कार्यक्रमाला पोलीस निरीक्षक श्रीमती विजया पंधरे (गाडगेनगर पोलीस स्टेशन) प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्यासोबत श्रीमती अवंती साखरे, मयुरा ताई देशमुख, श्रीमती योगिता ताई गिरासे, श्रीमती नंदाताई वाघमारे, श्रीमती भाग्यश्री चव्हाण, तसेच जनाब सईद सर, जनाब हफिज सर, श्री कुकडकर साहेब आणि युसुफ पॅलेसचे संचालक शेखुभाई यांची उपस्थिती होती.

महिलांच्या स्वयंरोजगार व सक्षमीकरणासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरले आहे. याआधीही रुबीना परवीन यांनी शेकडो महिलांना सिलाई व उद्यमशीलता प्रशिक्षण दिले आहे.कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शन केले. पोलीस पत्नी एकता मंचाच्या संचालिका श्रीमती योगिता गिरासे यांनीही महिलांना प्रेरणादायी विचार मांडले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अकील खान सर (सेवा) यांनी केले.

# पूरग्रस्तांसाठी सरसावले मदतीचे हात

## धामणगाव बाजार समिती व दत्तापूर खरेदी-विक्री संघाकडून आर्थिक मदत : धनादेश जिल्हाधिका-यांना युपूर्द



**विदर्भ प्रजासत्ताक दि.७धामणगाव रेल्वे**

राज्यात अतिवृष्टी व पुराचा लाखो हेक्टरवरील पिकांना फटका बसला आहे. शेकडो घरांचे नुकसान झाले आहे. दरम्यान, : नुकसानग्रस्तांना मदत देण्यासाठी धामणगाव कृषी उत्पन्न बाजार समिती व दत्तापूर शेतकी खरेदी विक्री संघाकडून मदतीचा धनादेश खा बळवंत वानखडे, माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप यांच्याउपस्थितीत जिल्हाधिकाऱ्यांना सुपूर्व करण्यात आला.

राज्यात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पावसाने थैमान घातले असून अनेक गावांमध्ये पूर आले आहेत. त्यात सर्वाधिक फटका बळीराजाला बसला. दुष्काळाच्या छायेखाली हतबल झालेले मराठवाड्यातील नागरिक व शेतकऱ्यांना धामणगाव कृषी उत्पन्न वाजार समिती व दत्तापुर (धामणगाव) शेतकी खरेदी विक्रीसंघाने मदतीचा हात पुढे केला आहे. राज्य शासनाच्या मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप, खा. बळवंत वानखडे यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकाऱ्यांना मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. बाजार समितीने १ लाख ५१ हजार व दत्तापूर शेतकी खरेदी विक्री संघाने एक लाख रुपये देऊन मदतीचा हात दिला आहे. यावेळी जिल्हा बँकचे संचालक श्रीकांत गावंडे,बाजार समितीच्या सभापती कविता गावंडे, उपसभापती संगिता गाडे, बाजार समितीचे संचालक राधेश्यामचांडक, दिनेश जगताप, रवी भुतडा, प्रमोद रोंघे, मंगेश बोबडे, संदीप दावेदार, देवराव बमनोटे, संदीप दावेदार, दिनेश जगताप, मुकुंद माहोरे, प्रशांत हुडे, गिरीष भुतडा, विपिन ठाकरे, सचिन सोमोसे, विलास भील, सुनील ठाकरे, चंदा निस्ताने, मेघा सबाने उपस्थित होते. दत्तापूर शेतकी खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष बबन मांडवगणे, उपाध्यक्ष प्रदीप मुंदडा, नरेंद्र पाचबुद्धे, हेमंत कडू, मधुकर सावलकर, भाऊराव अडकणे, सुरेंद्र जयस्वाल, सुनील भोगे, संकेत उभाड, मुकेश राठी, मनोज वेरूळकर, डॉ. भगवंत शिंदे, शालिनी कोंबे, मालती पावडे उपस्थित होते.

# महाराष्ट्रात पर्यावरणाशी संबंधित गुन्ह्यात ३० टक्क्यांनी वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ नागपूर**

पर्यावरणाशी संबंधित गुन्ह्यात महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर असून गुन्ह्यांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. २०२२च्या तुलनेत २०२३ मध्ये पर्यावरणाशी संबंधित गुन्ह्यात तब्बल ३० टक्क्यांनी वाढ झाल्याचे राष्ट्रीय गुन्हे नोंद शाखेच्या अहवालात म्हटले आहे.

अलीकडच्या काही वर्षात केंद्र शासनाने पर्यावरण, वन, जैवविविधता या कायद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल केले. या बदलाला पर्यावरण तसेच वन्यजीव अभ्यासकांनी प्रचंड विरोध केला. मात्र, त्यानंतरही मंजुरी देण्यात आली. या नव्या बदलामुळे वनक्षेत्र सहजपणे उद्योगक्षेत्रांसाठी वळते केले जात असल्याचे चित्र आहे. वनक्षेत्रातील प्रकल्पांची संख्या वाढत आहे. त्यातच आता पर्यावरणाशी संबंधित गुन्ह्यांचा देखील प्रश्न निर्माण झाला आहे.

राष्ट्रीय गुन्हे नोंद शाखेच्या अहवालानुसार, २०२३ मध्ये राज्यात पर्यावरणाशी संबंधित गुन्ह्यांची चार हजार ८५४ प्रकरणे नोंदवण्यात आली. २०२२ मध्ये हीच संख्या दोन हजार ४७८ तर २०२१ मध्ये एक हजार ९४ इतकी होती. २०२३ मध्ये अशा ९९.७ टक्के प्रकरणांमध्ये आरोपत्र दाखल करण्यात आले. २०२३ मध्ये तामिळनाडूत ४१ हजार ३०४ प्रकरणे नोंदवण्यात आली. केरळमध्ये आठ हजार ७८६ आणि राजस्थानमध्ये सात हजार ७९४ प्रकरणे नोंदवण्यात आली. या श्रेणीत महाराष्ट्र चार हजार ८५४ प्रकरणांसह देशात चौथ्या क्रमांकावर आहे. पर्यावरणाशी संबंधित सुमारे ९८ टक्के प्रकरणांमध्ये आरोपपत्र दाखल करण्यात आले.

# व्ही.एम.व्ही कॉलेज मध्ये परीक्षा फॉर्म प्रक्रियेतील गोंधळाविरोधात विद्यार्थ्यांचा एल्गार

## परीक्षा फॉर्मसह इतर विषयांकडे कॉलेज प्रशासनाने लक्ष देण्याची गरज





**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

शासकीय विदर्भ ज्ञान संस्था महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मागील वर्षभरापासून परीक्षा फॉर्म भरण्याच्या प्रक्रियेत सातत्याने येणाऱ्या अडचणींविरोधात आवाज उठवला आहे. वेळापत्रकाच्या अभावामुळे आणि ऑनलाइन प्रणाली उपलब्ध नसल्यामुळे होत असलेल्या गोंधळाविरोधात विद्यार्थ्यांनी आज आक्रमक पवित्रा घेतल्याने काही वेळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती.

विद्यार्थ्यांनी यासंदर्भात यापूर्वी तीन वेळा लेखी अर्ज सादर केले होते, परंतु कोणतीही ठोस कृती न झाल्यामुळे आज ७ ऑक्टोबर रोजी कॉलेजच्या प्रवेशद्वारावर बसून आंदोलन करण्याचा निर्णय घेतलापरीक्षा वेळापत्रक आधीच व निश्चित स्वरूपात जाहीर करणे,परीक्षा फॉर्म व शुल्क भरण्यासाठी सक्षम ऑनलाइन पोर्टल,सर्व प्रक्रियांचे वेळेवर व पारदर्शक संवादया प्रमुख मागण्या विद्यार्थ्यांच्या आहेत मात्र कॉलेज प्रशासन सातत्याने या कडे दुर्लक्ष करते त्यामुळे विद्यार्थ्यांनी आज आक्रमक पवित्रा घेतला असता कॉलेज चे प्रोफेसर शिवानंद कुमार यांनी विद्यार्थ्यांसोबत वाद घालत टीसी काढून चालते व्हा! असे म्हणत एका विधयार्थ्याचा मोबाईल हिसकावून घेतला.त्यामुळे या ठिकाणी विद्यार्थी व प्रोफेसर यांच्यात चांगलाच वाद झाला.विद्यार्थ्यांनी आपले निवेदन महाविद्यालय प्रशासन, जिल्हाधिकारी, गाडगे नगर पोलीस स्टेशन तसेच संयुक्त संचालक, उच्च शिक्षण विभाग यांना सादर केले आहे.विद्यार्थ्यांनी हे आंदोलन शांततेच्या मार्गाने राबवण्याचा निर्णय घेतलेला असून, प्रशासनाने तातडीने लक्ष घालून योग्य निर्णय घ्यावा अशी अपेक्षा सर्व स्तरातून व्यक्त होत आहे.

# बच्चू कडूंच्या नेतृत्वाखाली तिवसा येथे शेतकऱ्यांचा महामार्गावर रास्ता रोको आंदोलन

## ओल्या दुष्काळाची घोषणा व कर्जमाफीची जोरदार मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ तिवसा**

राज्य सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी पॅकेजवर प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी असमाधान व्यक्त केले असून, त्यांच्या नेतृत्वाखाली अमरावती जिल्ह्यातील तिवसा येथे अमरावती-नागपूर राष्ट्रीय महामार्गावर जोरदार रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.या आंदोलनात हजारो शेतकरी सहभागी झाले होते. राज्य सरकारच्या निषेधार्थ शेतकरी रस्त्यावर उतरले असून, संपूर्ण महाराष्ट्रात ओला दुष्काळ जाहीर करा आणि शेतकऱ्यांची तातडीने कर्जमाफी करा अशी जोरदार मागणी बच्चू कडू यांनी केली आहे.आंदोलनादरम्यान महिलांनी रस्त्यावर सोयाबीन जाळून आणि बांगड्या फेकून तीव्र संताप व्यक्त केला. बच्चू कडू यांच्या उपस्थितीत शेतकरी महिलांनी राज्य सरकारच्या प्रतिकात्मक पुतळ्यावर बांगड्या फेकत पुतळा जाळून निषेध केला.बच्चू कडू यांनी राज्य सरकारवर शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेलं पॅकेज हे बनवाबनवीचं असल्याचा आरोप केला.या आंदोलनाचं पुढचं पाऊल म्हणून २८ तारखेला नागपूरमध्ये मोठं आंदोलन होणार असल्याची घोषणाही करण्यात आली आहे.

# तिवसा तालुक्यात सोयाबीन कापणीला व काढणीला सुरवात

## शेतकऱ्यांना एकरी एक क्विंटल ते दोन क्वी.चा एवरेज शेतकरी हवालदिल,दिवाळी अंधारात जाण्याची शक्यता

**सुनील घोरमाडे**

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ तिवसा**

तिवसा तालुक्यातील शेतकरी दिवाळी-दसऱ्याच्या तोंडावर गंभीर संकटात सापडले आहेत. हंगामाचा आनंद साजरा करण्याऐवजी शेतकरी आज नुसत्या चिंता मोजत आहेत. तालुक्यातील प्रमुख पीक असलेले सोयाबीन हे याच काळात कापणीस येते, मात्र यंदा निसर्गाने पाठ फिरवली आहे. अतिवृष्टी, अचानक आलेल्या पाण्याच्या साचण्यामुळे काही भागातील पिके रोगराईने पूर्णपणे निकामी झाली आहे, तर काही ठिकाणी पिकं सडून नष्ट झाली. ज्या शेतकऱ्यांच्या भागात पावसाचं प्रमाण कमी आले, तिथे सोयाबीनच्या शेंगाच नीट भरल्या नाहीत. काही ठिकाणी पिकं वाहून गेली तर उरलेल्या ठिकाणी उभ्या पिकातूनही शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पन्न मिळणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.सोयाबीनसह तूर लागवड केलेल्या शेतकऱ्यांना सध्या सर्वाधिक फटका बसला आहे. मजूरांच्या टंचाईमुळे सोंगणीसाठी मजुरांना तब्बल तीन हजार रुपये प्रति एकर प्रमाणे मजुरी द्यावी लागते. त्यावरून पिकं घरापर्यंत नेण्याचा खर्च, यंत्रांचे भाडे, प्रेशर टाक्या, फवारणी औषधे आणि इतर गरजांमुळे शेतकऱ्यांची आर्थिक अवस्था ढासळली आहे.शासनाने जाहीर केलेली साडेआठ हजार रुपये प्रति हेक्टर इतकी मदत ही केवळ तुटपुंजी ठरत असून, प्रत्यक्ष खर्चाच्या तुलनेत ती थेंबभर दिलासा देखील देत नाही.



माझ्याकडे सहा एकर जमीन आहे, त्यापैकी चार एकरावर सोयाबीन लावले आहे. पण यंदा अतिवृष्टी, पाण्याचं साचणं आणि रोगराईमुळे पिकाचं मोठं नुकसान झालं. लावणीपासून ते काढणीपर्यंत एका एकरावर मोठ्या प्रमाणात खर्च येतो. त्यात मजूर, यंत्रभाडं, औषधं, खतं – सगळ्याच गोष्टींचे दर वाढले आहेत. पण सरकारने दरवर्षीप्रमाणेच सोयाबीन, संत्रा, तूर, कापूस यांना तसाच भाव दिला आहे. शासनानं ओला-दुष्काळ मदत जाहीर केली तीही अपुरीच आहे. एवढ्या रकमेने काहीही सुटत नाही. दसरा गेला, पण दिवाळी साजरी करण्याचीही ताकद नाही उरली.सरकारनं खरंच शेतकऱ्यांची परिस्थिती ओळखून आम्हाला हेक्टरी किमान ४० ते ५० हजार रुपयांची मदत द्यायला हवी. नाहीतर अल्पभूधारक शेतकऱ्यांचं भविष्य अंधारमय होणार आहे.

**कुणाल राऊत युवा शेतकरी, वणी, तिवसा**

### संकटाच्या छायेत दिवाळी..!

सोयाबीन, कापूस, संत्रा या सर्व पिकांना मिळालेल्या दरवाढीचा परिणाम नगण्य असून, बाजारभावातही अनिश्चितता कायम आहे. पीक कर्जाची परतफेड, खतं-बियाण्याचा वाढता खर्च आणि उत्पादन घटल्यामुळे शेतकरी आज आर्थिक कोंडीत सापडला आहे. परप्रांतीय मजुरांच्या मदतीने शेतकरी दिवसभर कुटुंबासह शेतात घाम गाळत आहे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत कष्ट करूनही हातात काहीच येत नसल्याची खंत प्रत्येक शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर दिसते. निसर्गानं खोपलंच, पण शेती सोडायची नाही, अशी जिद्द शेतकरी राजामध्ये आजही आहे. संकटाशी दोन हात करत तिवसा तालुक्यात सोयाबीन काढणीला सुरुवात झाली असून, शेतात कुटुंबासह राबणाऱ्या शेतकऱ्यांचे दृश्य हे मेहनत आणि हताशेचा संगम दाखवत आहे.

# विदर्भातील कर्तुत्ववान शेतकरी पुरुष आणि महिलांसाठी प्रतिष्ठेचे दोन पुरस्कार घोषित

## शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव (भाऊसाहेब) देशमुख जयंती उत्सवाच्या मुख्य सोहळ्यात होणार पुरस्कारांचे वितरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ अमरावती**

विदर्भातील प्रेरणादायी शेतकरी पुरुष व महिलांच्या कार्याची दखल घेत श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीच्या वतीने 'शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार' आणि नव्याने सुरू करण्यात आलेला 'स्व. शरद जोशी स्मृती उत्कृष्ट शेतकरी (पुरुष) पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. या दोन्ही पुरस्कारांचे वितरण शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव (भाऊसाहेब) देशमुख जयंती उत्सवाच्या मुख्य सोहळ्यात सन्मानपूर्वक करण्यात येणार आहे.पत्रकार परिषदेत संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन प्र. देशमुख यांनी माहिती दिली.हे पुरस्कार विदर्भातील प्रत्यक्ष शेतीत कार्यरत असलेल्या शेतकरी पुरुष व महिलांना दिले जाणार आहेत. मागील वर्षी सुरू झालेला शारदाबाई पवार पुरस्कार यावर्षी देखील दिला जाणार आहे,



तर यंदापासून शेतकरी नेते स्व. शरद जोशी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ उत्कृष्ट शेतकरी (पुरुष) पुरस्कार सुरू करण्यात आला आहे.पत्रकार परिषदेला अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्यासह उपाध्यक्ष ड. जे. व्ही. पाटील पुसदेकर, केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य सुरेशराव खोटरे, सुभाषराव बनसोड, सचिव डॉ. वि. गो. ठाकरे तसेच विविध प्राचार्य व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.संस्थेच्या वतीने दोन्ही पुरस्कारांसाठी दान निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मा. खा. शरद पवार व मा. ना. नितीन गडकरी यांचे विशेष आभार मानण्यात आले.

### असे राहणार पुरस्काराचे स्वरूप

शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार:

रोख रक्कम १,११,१११/- स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ

निधी – मा. खा. शरदचंद्र पवार (राष्ट्रवादी काँग्रेस)

स्व. शरद जोशी स्मृती उत्कृष्ट शेतकरी (पुरुष) पुरस्कार:

रोख रक्कम १,११,१११/- स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ

निधी – ना. नितीन गडकरी (केंद्रीय मंत्री, भाजप)

### पात्रता व निकष

फक्त विदर्भातील प्रत्यक्ष शेती करणारे महिला व पुरुष शेतकरी पात्र, शेती त्यांच्या किंवा त्यांच्या जोडीदाराच्या नावावर असावी, सेंद्रिय शेती, बीजोत्पादन, प्रक्रिया, निर्यात, यांत्रिकीकरण, गोबर गॅस, ठिबक सिंचन, दुग्धव्यवसाय इत्यादी क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी, अन्य शेतकऱ्यांना मार्गदर्शन, कृषी मेळावे, स्पर्धा, प्रचार-प्रसारात सहभाग, आवश्यक कागदपत्रे: सातबारा, आठ अ, प्रमाणपत्रे, प्रतिज्ञापत्र

### प्रस्ताव सादर करण्याचे ठिकाण व अंतिम तारीख

श्री शिवाजी कृषी महाविद्यालय, मोर्शी रोड, अमरावती, अर्जाचा नमुना www.ssacpdkv.org या संकेतस्थळावर उपलब्ध, शेवटची तारीख: २८ ऑक्टोबर २०२५, अर्ज विहित नमुन्यात व सर्व कागदपत्रांसह वेळेत सादर करणे आवश्यक.

# सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर हल्ल्याचा युवक काँग्रेसकडून निषेध - हा संविधानावर हल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

भारताचे सरन्यायाधीश आणि अमरावतीचे सुपुत्र मा. भूषण गवई यांच्यावर काल सर्वोच्च न्यायालयात झालेल्या भ्याड हल्ल्याचा तीव्र निषेध अमरावती विधानसभा युवक काँग्रेसतर्फे करण्यात आला. या निषेध आंदोलनात युवक काँग्रेसने हल्लेखोर मनुवादी प्रवृत्तीचा समाचार घेत संविधान आणि न्यायव्यवस्थेच्या रक्षणासाठी संघर्षाची भूमिका घेतली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर (इर्विन) चौक, अमरावती येथे आयोजित या आंदोलनात युवक काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी मनुवादी प्रवृत्तीचा निषेध असो, संविधान का अपमान नही सहेगा हिंदुस्तान, संविधान के सम्मान मे युवक काँग्रेस मैदान मे, अमरावती के भूषण, देश के भूषण अशा जोरदार घोषणा देत परिसर दणाणून टाकला.

युवक काँग्रेसने स्पष्टपणे म्हटले की, मा. भूषण गवई यांच्यावर झालेला हल्ला म्हणजे एका व्यक्तीवर नाही, तर भारतीय संविधानावर आणि लोकशाही न्यायमूल्यांवर झालेला हल्ला आहे. हा प्रकार भाजप व संघ परिवाराने देशात पसरवलेल्या विषारी वातावरणाचे फलित असल्याची टीका यावेळी करण्यात आली.युवक काँग्रेसने असा इशारा दिला की, मनुवादी आणि जातीय प्रवृत्तींचा देशात पाय रोवू दिला जाणार नाही, आणि अशा शक्तींविरोधात युवक काँग्रेस सदैव कार्यरत राहील.

# भ्याड हल्ल्याचा निषेधः अमरावती जिल्हा वकील संघाचा ठराव एकमुखाने मंजूर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात कार्यरत असलेल्या न्यायमूर्ती श्री. भूषण गवई यांच्या न्यायालयात एका व्यक्तीने पायातील जोडा काढून हल्ला करण्याचा प्रयत्न केला. सुरक्षारक्षकांनी तत्काळ त्या व्यक्तीस अडवून ताब्यात घेतले. ही घटना भारताच्या न्यायव्यवस्थेस कलंक लावणारी असून, संपूर्ण देशासाठी ही एक काळाकुट्ट आणि लाजिरवाणी घटना ठरली आहे.या घटनेचा अमरावती जिल्हा वकील संघाने या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला असून, आजच्या विशेष बैठकीत सर्वानुमते ठराव मंजूर करून हा निषेध नोंदवण्यात आला आहे.

वकील संघाच्या मते, धार्मिक भावना भडकावून न्यायालयासारख्या पवित्र स्थळी अशा प्रकारचा हल्ला करणे हा लोकशाही व कायद्याच्या राजवटीवर आघात आहे.वकील संघाने संबंधित आरोपीवर कठोर कायदेशीर कारवाईची मागणी केली असून, अशा मानसिकतेच्या मुळाशी जाऊन त्याचे उच्चस्तरीय विश्लेषण होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले आहे.अमरावती जिल्हा वकील संघाच्या वतीने हे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आले आहे.

# मोर्शी तालुक्यातील संत्रा गळतीमुळे झालेल्या नुकसानीची कृषी विभागाने केली पाहणी

## संत्रा उत्पादनात ५० टक्के घट आल्यामुळे शासनाला सकारात्मक अहवाल पाठवा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७मोर्शी**

विदर्भातील अमरावती जिल्ह्यात अनेक संत्रा उत्पादक दरवर्षी मृग आणि आंबिया बहार संत्रा पिकाचे उत्पादन घेतात. मात्र संत्रा पिकवणारा हा शेतकरी सलग सहाव्या वर्षी मेटाकुटीला आला आहे. त्याचं मुख्य कारण म्हणजे संत्रा बागांना लागलेली गळती. सध्या अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यात संत्रा बागांना मोठ्या प्रमाणात गळती लागली असल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकरी संकटात सापडला असतांना संत्रा गळतीमुळे झालेल्या नुकसानाची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी व त्याची कारणे शोधून उपाययोजना करण्यासाठी मोर्शी तालुका कृषी अधिकारी पुरुषोत्तम माने, राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके, कृषी पर्यवेक्षक, कृषी सहाय्यक, यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मोर्शी तालुक्यातील संत्रा बागांची पाहणी करून सर्वेक्षण करण्यात आले. मोर्शी तालुका विक्रमी संत्रा उत्पादनासाठी प्रसिद्ध असून मोर्शी तालुक्यामध्ये आंबिया बहराची फळगळ मोठ्या प्रमाणात झाली असल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकरी हवालदिल झाला आहे त्यामुळे शासनाने संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत करून दिलासा द्यावा यासाठी मोर्शी विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे संत्रा फळ गळतीचे सर्वेक्षण करून नुकसान भरपाई



मदत देण्याची मागणी केली होती त्यांच्या मागणीची दखल घेऊन आज मोर्शी वरूड तालुक्यामध्ये संत्रा गळतीमुळे झालेल्या नुकसानाची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी व त्याची कारणे शोधून उपाययोजना करण्यासाठी संत्रा आंबिया व मृग बहार फळगळ संदर्भात मोर्शी तालुक्यातील संत्रा बागांची पाहणी करून सर्वेक्षण करण्यात आले.मोर्शी तालुक्यात आंबिया व मृग या दोन्ही बहारात अज्ञात रोगाचे आक्रमण, संत्रा गळती, पावसाचा खंड, अतिवृष्टी, वाढलेले तापमान इत्यादी कारणामुळे आंबिया बहारात फळगळ, मृग बहारात बहार न फुटणे व फुटलेल्या बहाराची गळ होणे अशा विविध अडचणी निर्माण झाल्यामुळे सदर फळगळीमुळे संत्रा उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट निर्माण झालेली आहे.यावेळी मोर्शी तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतक-यांची आंबिया व मृग बहारासाठी दापोरी, हिवरखेड, डोंगर यावली, घोडदेव, पाळा, सालबर्डी येथील संत्रा बागांची रेण्डमली तपासणी करून फळगळ नियंत्रणात्मक उपाय योजनांबाबत शेतक-यांना मार्गदर्शन करून फळगळीमुळे संत्रा उत्पादनात ५० टक्के पेक्षा जास्त घट झाली असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष रुपेश वाळके यांनी कृषी विभागाच्या निदर्शनास आणून दिले. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत मदत देणे करीता संपुर्ण सर्वेक्षण करण्याची गरज असल्याचे सांगून याबाबत शासनाकडे तात्काळ ५० टक्के पेक्षा जास्त घट झाल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाल्याचा सकारात्मक अहवाल पाठविण्याची विनंतीसंत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे.यावेळी कृषी पर्यवेक्षक फुले, कृषी सहाय्यक अंधारे, मनीष काळे, सुनील केचे, अभिजित कराळे, मनिष गुडधे, बंडू राऊत, पंकज भोरगडे, कांचन कुकडे नंदूभाऊ बोराळकर, सागर डगवार , दिनेश गांजरे, निलेश धुर्वे यांच्यासह संत्रा उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत